साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्विमिंग व थंडीसाठी
स्विमिंग सुट, कॅप, गॉगल्स, लेगीन्ज टॉप, बरमुडा...
थर्मल, जर्किन स्वेटर, ग्लोज, सॉक्स, मफलर, कानटोपी...
ब्रँण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि.०४.०६.२०२६ | अंक नं. ०५५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

अधिक मास आता बनवा अधिक खास
खास धोंड्यानिमित्त जावाई व मुलीला वाण देण्यासाठी आकर्षक व वेगवेगळ्या वजनामधील चांदीची भांडी उपलब्ध.
2014 पासून आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# विधानपरिषद सदस्यपदी प्राजक्त तनपुरेंची बिनविरोध निवड



नगर – विधानपरिषद निवडणुकीच्या अहिल्यानगर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात ४ मे रोजी करण ससाणे यांनी भरलेला अपक्ष अर्ज मागे घेतला. त्यानंतर इतर अपक्षांनीही आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. श्रीगोंद्याचे दत्तात्रय पानसरे यांनी शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध विधानपरिषद सदस्यपदी निवडीचा मार्ग मोकळा झाला. आता केवळ त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा बाकी आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपण्यास अवघे तीन दिवस शिल्लक असताना महाविकास आघाडीच्या प्रदेशस्तरीय नेत्यांनी सर्व १७ जागा लढविण्याची घोषणा केली होती. मात्र, तरीही उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपण्याची दोन दिवस अगोदरपर्यंत जिल्ह्यातील महाविकास आघाडीत सामसूम होती. ३० व ३१ मे रोजी महाविकास आघाडीत थोडी हालचाल दिसली. मात्र, महाविकास आघाडीने शेवटपर्यंत आपला उमेदवार जाहीर केला नाही. कॉंग्रेसचे श्रीरामपूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष करण ससाणे यांनी ३० मे रोजीच अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. याबाबत त्यांच्याशी संवाद साधला असता पक्षाकडून एबी फॉर्म मिळाला नसल्याने आपण अपक्ष अर्ज दाखल केला, अशी खंत त्यांनी

## सर्व अपक्षांनी निवडणुकीच्या रिंगणातून घेतले अर्ज माघारी

व्यक्त केली होती. ३१ मे रोजी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके या उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे सांगण्यात आले. त्यांनी १ जून रोजी सकाळी उमेदवारी अर्जही घेतला होता. तथापि, मुदत संपली तरी त्यांनी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे महाविकास आघाडी विधानपरिषदेच्या निवडणुकीत अहिल्यानगरमधून उमेदवारही देवू शकले नाहीत.

दरम्यान कॉंग्रेसच्या या कोंडीविषयी बोलताना एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, विधानपरिषदेच्या निवडणुकीत मतदारसंख्या पाहिली असता भाजप, महायुतीच्या बाजुने स्पष्ट कौल मिळणार असे दिसत होते. तर कॉंग्रेस, महाविकास आघाडीकडे या निवडणुकीत विरोधकांना टक्कर देण्यापुरतेही मतदान नव्हते. त्यामुळे पराभव समोर दिसत असताना कोण या निवडणुकीत उतरेल. त्यामुळे कॉंग्रेसच नव्हे, संपूर्ण महाविकास आघाडीत कोणीही अहिल्यानगरची जागा लढण्यास तयार नव्हते, असे सांगण्यात आले.

४ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत होती. कॉंग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष असलेले आणि विधान परिषदेसाठी अपक्ष अर्ज भरलेले करण ससाणे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आणि ते नॉट रिचेबल झाले. तसेच मच्छिंद्र धुमाळ, कमलेश गांधी यांनी लवकरच आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले होते. मात्र, श्रीगोंद्याचे दत्तात्रय पानसरे यांचा अर्ज अखेरच्या क्षणापर्यंत मागे घेण्यात आलेला नव्हता. त्यामुळे भाजपमध्ये बिनविरोधची आशा मावळते की काय, अशा शक्यतेने वेगवान हालचाली झाल्या आणि अखेरच्या क्षणी पानसरे यांचे प्रतिनिधी अर्ज मागे घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले. मुदत संपण्यास अगदी काही मिनिटे बाकी असताना त्यांनी पानसरे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.

## उमेदवारीबाबत कॉंग्रेससोबत चर्चाच झाली नव्हती : करण ससाणे

कॉंग्रेस पक्षासोबत उमेदवारीबाबत माझे बोलणे झालेले नव्हते. मला ही निवडणूक लढवायची देखील नव्हती. पण श्रीरामपूरमधील नगरसेवकांनी मला आग्रह करुन अर्ज दाखल करायला लावला. म्हणून मी अपक्ष अर्ज दाखल केला होता. आता देखील नगरसेवकांशी चर्चा करुन मी अर्ज मागे घेतला. अर्ज मागे घेण्यासाठी माझ्यावर कोणाचाही दबाव नव्हता. मी सर्व नगरसेवकांच्या इच्छेखातर अर्ज दाखल केला होता. निवडणूक लढविण्याची माझी इच्छा नव्हती. कॉंग्रेसकडून मला कधीही उमेदवारीबाबत विचारणा झाली नव्हती, अशी प्रतिक्रिया करण ससाणे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

मोफत नेत्र तपासणी
अगदी मोफत
वार : रविवारी ७ जून २०२६ रोजी
वेळ : सकाळी १० ते दुपारी २ वाजे पर्यंत.
कॉम्प्युटरने डोळ्यांचे चष्म्याचे नंबर काढून मिळेल
फोन करुन येणे आवश्यक
शाह चष्मावाला हातमपुरा चौक, शर्मा ज्वेलर्स शेजारी, अहिल्यानगर
मो. 9225323853

अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस,पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेढावाला रजवाडी गुजराती थाळी
कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

# अवकाळीचा तडाखा; वादळाने ४ घरे पडली, वीजवाहिन्या तुटल्याने शहर बुडाले अंधारात

नगर – अवकाळी पावसाने ३ जून रोजी जिल्ह्यातील विविध भागात जोरदार तडाखा दिला. शहरात सायंकाळी ७.१५ वाजेनंतर जोरदार वादळी वारे वाहू लागले. पाठोपाठ पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. या वादळाने अनेक ठिकाणी महावितरणच्या वीज वाहक तारा तुटल्या. झाडे कोसळले. मुख्य वीज वाहिन्यांमध्येही बिघाड झाला. त्यामुळे सर्व शहर अंधारात बुडाले. तसेच या वादळामुळे ४ घरेदेखील पडली.

अवकाळीच्या पावसाचा दरवर्षीपेक्षा या वर्षी जोर कमी आहे. मे मध्ये पडणारा अवकाळी पाऊस जूनमध्ये पडू लागला आहे. दरवर्षीच्या सरासरीच्या तुलनेत या वर्षी निम्माच पाऊस झाला आहे. नगर, कर्जत, पाथर्डी आणि नेवासा तालुक्यांत या अवकाळी पावसाचे प्रमाण समाधानकारक आहे. तर राहुरी, राहाता, पारनेर, अकोले, कोपरगाव या भागात अपेक्षित पाऊस झालेला नाही. मात्र, वादळ सर्वत्र जोरदार आहे. या वादळामुळे झाडे पडणे, फांद्या तुटणे, घरांवरील पत्रे उडणे, भिंत पडणे, वीज वाहक तारा तुटणे, पोल वाकणे अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे.

३ जून रोजी रात्री आलेल्या वादळी पावसामुळे शहराला वीज पुरवठ्या करणाऱ्या केडगाव येथील मुख्य वाहिनीत बिघाड झाल्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले होते. याशिवाय सावेडी परिसरात वादळाने झाडे, बॅनर, झाडांच्या फांद्या तुटून तारांवर पडल्यामुळे वीज वाहक तारा तुटल्या होत्या. रात्री पावणेआठ वाजता सर्वत्र वीज पुरवठा खंडीत झाला होता. हा वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी, अभियंते रात्री उशिरापर्यंत दुरुस्तीचे काम करीत होते. त्यामुळे रात्री सुमारे १२ वाजेदरम्यान शहरातील अनेक भागातील वीजपुरवठा सुरळीत झाला. मात्र, लघुदाबावरील वीज पुरवठा आज सकाळपर्यंत सुरळीत होऊ शकला नव्हता. त्यामुळे शहरातील काही भाग अंधारातच बुडालेला होता. गुलमोहोर रोडवरील फिडरवर झाडे, बॅनर पडले होते. त्यामुळे मध्यरात्री दीड वाजेपर्यंत या फिडरचे काम चालू होते. दीड वाजता या फिडरमधून वीज पुरवठा सुरळीत सुरु झाला.

दरम्यान या वादळामुळे कर्जत तालुक्यातील एका घराची भींत पडून नुकसान झाले तर संगमनेरला चार घरांच्या भिंती कोसळल्या. या घटनांमध्ये कोणालाही इजा झालेली नसली तरी नागरिकांचे मोठे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय काही ठिकाणी शेतपिकांचेही नुकसान झाले. शेतात काढून ठेवलेला कांदा भिजला तर काहींच्या चाऱ्याचे नुकसान झाले. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

१० वी/१२वी/पदवीला कमी मार्कस् मिळाले किंवा नापास झालात !
दर्जेदार शिक्षण — प्रवेश सूचना — दर्जेदार नोकरी
INSTITUTE OF PARA MEDICAL SCIENCES
1) नर्सिंग कोर्सेस
2) PGDMLT - P.G. Dip. In Medical Lab Tech
3) DMLT - Dip in Medical Lab Tech.
4) Health & Sanitory Inspector
5) Operation Theater Assis. / Tech.
6) CCH / CGO / CCS - 2 Months (Dr. of any faculty)
7) Hospital Management
8) Dip. Course in Physiotherapy
9) X-Ray / ECG / C.T. Scan / MRI / Sonography / Dialysis / Cath Lab Tech.
10) Dental Mechanics Tech./ Hygienist Tech.
11) Dental Assistant
12) Optometry / Optician Tech
BOMBAY ACADEMY OF ARTS & EDUCATION
1) Pre Primary Teachers Course (बालवाडी/अंगणवाडी शिक्षिका)
MONTESSORI COURSE
2) Beauty Parlor & Hair Dressing
3) Fire & Safety Management
4) बांधकाम पर्यवेक्षक
5) Computer Technology (Operating System, Graphics Designing, Website Designing, Software Developer, Networking, Database Operator)
J.J.M.F. JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION
Mo. 8830685732 | Visit us : www.jjmf.info | Email : jjmf@rediffmail.com
उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी

पंधरावे पुण्यस्मरण — नववे पुण्यस्मरण
भावपूर्ण श्रद्धांजली
स्व. डॉ. बबनराव भाऊराव आंधळे — स्व. दि. ०५/०६/२०११
स्व. सिंधू बबनराव आंधळे — स्व. दि. ०८/०६/२०१७
घराचा आधार, जीवनाचा प्रकाश आणि संस्कारांची शिदोरी देणाऱ्या प्रिय आई-वडिलांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली.
* दुःखांकित *
चि. श्रीरंग प्रसाद आंधळे
सौ. राजश्री प्रसाद आंधळे | प्रसाद बबनराव आंधळे
डॉ.सौ. प्राजक्ता गोकूळ पालवे | डॉ. गोकूळ एकनाथ पालवे
डॉ.सौ. प्रज्ञा अमोल शिरसाट | डॉ. अमोल बाबासाहेब शिरसाट
समस्त आंधळे परिवार

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

भावपूर्ण श्रद्धांजली
सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे, शिकवण आम्हाला दिली अविरत सेवेची, कर्तव्य आम्हाला शिकवले स्वःकष्टाचे, आदर्श आम्हाला दिले सद्‌विचारांचे... आपली शिकवण हिच सोबती आमची जन्मजन्मांतरीची...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..
समस्त तलरेजा परिवार
स्व. भावन काकुमल तलरेजा — स्व. दि. २४/०५/२०२६
पुनीत एन्टरप्राइजेस बुरुडगांव रोड, अहिल्यानगर
Mo. 8390040404 / 9271040404

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रँण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट,क्वाडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स,फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ : सकाळी १०.३० ते रात्री ८.३० पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांनी ३० जुलैपर्यंत ऑनलाईन हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे

नगर - संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांनी हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करून ३० जुलै पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. योजनेचे अनुदान नियमितपणे सुरू राहण्यासाठी सर्व लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन पारनेर तहसीलदार गायत्री सौंदाणे यांनी केले आहे.

शासनाच्या नव्या निर्णयानुसार हयातीचे प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यासाठी ५० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. स्मार्टफोन असलेले लाभार्थी प्ले स्टोअरवरून "Beneficiary Verification' व "Aadhaar Face RD' हे ॲप डाउनलोड करू शकतात. या ॲपवर आधार क्रमांक व मोबाईल क्रमांकाच्या साहाय्याने नोंदणी करून चेहरा किंवा बोटांच्या ठशांची पडताळणी केल्यानंतर हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त करता येईल.

ज्यांच्याकडे स्मार्टफोन नाही, अशा लाभार्थ्यांसाठी सेतू केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रांवर ही सुविधा उपलब्ध आहे. ऑनलाईन हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित तलाठी यांच्याकडे सादर करावे.

या प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे व अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. लाभार्थ्यांनी स्वतःच्या आधार कार्डची छायाप्रत सोबत ठेवणे आवश्यक आहे. तसेच त्यांचा अद्ययावत मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडलेला असणे बंधनकारक आहे.

लाभार्थ्यांचे बँक खाते आधारशी संलग्न (मॅपिंग) असणे आवश्यक असून त्यानंतरच हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येईल. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी विहित मुदतीत आवश्यक बाबींची पूर्तता करून हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे, असेही तहसीलदार श्रीमती सौंदाणे यांनी सांगितले आहे.

# अहिल्यानगरच्या फेज-२, अमृत पाणी योजनेत भ्रष्टाचार; सखोल चौकशी करण्याबाबत 'नगर विकास'कडे तक्रार

### नगरकर तहानलेले, ठेकेदार तुपाशी; पाणी योजनांतील भ्रष्टाचार बाहेर काढा : किरण काळे

नगर - अहिल्यानगरकरांना पाणी मिळाले नाही, पण शेकडो कोटी रुपये खर्च झाल्याचे दाखवण्यात आले. मग हे पैसे नेमके गेले कुठे? पाणी गायब झाले की पैसा गायब झाला? असा सवाल उपस्थित करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी फेज-२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांतील निकृष्ट कामे व भ्रष्टाचाराच्या सखोल चौकशीची मागणी राज्य शासनाकडे केली आहे. नगर विकास मंत्री व खात्याच्या प्रधान सचिवांकडे लेखी तक्रारीद्वारे ही मागणी केली आहे.

पाठविलेल्या तक्रारीत काळे यांनी सरकार, मनपा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या कारभारावर हल्लाबोल केला आहे. फेज-२ आणि अमृत पाणीपुरवठा योजनांवर सुमारे ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च करण्यात आला. मात्र आजही शहरातील अनेक भागांत एक दिवसाआड पाणीपुरवठा होतो, काही भागांत तीन-चार दिवसांनी नळाला पाणी येते, तर अनेक नागरिकांना टँकरच्या भरवशावर जगावे लागत आहे. नगरकर तहानलेले आणि ठेकेदार तुपाशी अशी परिस्थिती आज शहरात निर्माण झाली आहे. पाणी योजनांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी झाली, पण नागरिकांच्या हाती मात्र रिकामे हंडे आणि कोरडे नळ आले, अशी टीका काळे यांनी केली.



#### या बाबींची चौकशी करा

फेज-२ आणि अमृत योजनांना आजपर्यंत पूर्णता प्रमाणपत्रे मिळाली आहेत का? कामे मंजूर आराखड्यानुसार झाली का? गुणवत्ता चाचण्या योग्य झाल्या का? निविदा प्रक्रियेत काही गैरव्यवहार झाला का? खर्च झालेल्या पैशांच्या तुलनेत पाणीपुरवठा का वाढला नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे शासनाने सखोल चौकशी करून जनतेसमोर ठेवावीत, अशी मागणी काळेंनी केली आहे.

काळे म्हणाले की, आधीच्या ३०० कोटी रुपयांच्या कामांचा हिशोब देण्यास मनपा प्रशासन आणि सत्ताधारी तयार नाहीत. मात्र त्याचवेळी जागतिक बँकेच्या माध्यमातून नव्याने शेकडो कोटी रुपयांचे कर्ज काढण्याची तयारी सुरू आहे. आधीच्या योजनांचे अपयश लपवण्यासाठी आणि नव्या कर्जाच्या माध्यमातून ठेकेदार, आपले बगल बच्चे यांना पोसण्यासाठी हा डाव रचला जात असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

#### योजनांचे तांत्रिक लेखापरीक्षण करा

महापालिकेकडे कर्मचारी पगार, वीजबिले आणि मूलभूत कामांसाठी निधी नाही. तरीदेखील नव्या कर्जाचा डोंगर नगरकरांच्या माथी मारण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळे फेज-२ आणि अमृत योजनांची न्याय्य, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. योजनांचे तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात यावे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही नव्या कर्जाधारित पाणी योजनेस मंजुरी देऊ नये, अशी मागणी ठाकरे शिवसेनेने राज्य शासनाकडे केली आहे.

# अहिल्यानगर शहरातील हॉस्पिटल मधील मेडिकल तसेच मावा, गुटखा विकणाऱ्यांवर कारवाई करा

### कारवाईसाठी तुकाराम मुंडे यांना नितीन भुतारे यांनी घातले साकडे



नगर - शहरात असलेल्या अनेक मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयांनी रुग्णांसाठी एक जाचक अट घातली असून, उपचारादरम्यान लागणारी औषधे रुग्णालयातील मेडिकलमधूनच खरेदी करण्याची सक्ती केली जात आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना विश्वासात न घेता परस्पर औषधे आणून त्यांच्याकडून बाजारभावापेक्षा अधिक दराने पैसे उकळले जात असून, यात जेनेरिक औषधांचीही चढ्या दराने विक्री होत असल्याने सर्वसामान्यांची मोठी आर्थिक पिळवणूक होत असल्याची तक्रार नितीन भुतारे यांनी केली. एका बाजूला रुग्णालयांमधील या अनधिकृत औषधविक्रीचा व्यवसाय फोफावला असताना, दुसऱ्या बाजूला शहरातील पानटपरी आणि इतर ठिकाणी सर्रासपणे तंबाखूजन्य मावा व गुटख्याची विक्री सुरू असल्याचे ते म्हणाले.

अहिल्यानगर शहरात सुरू असलेल्या रुग्णलूट आणि अवैध तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात आता संताप व्यक्त केला जात असून, नितीन भुतारे यांनी या दोन्ही बाबींवर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केली आहे.

राज्यभरात गुटखाबंदी असतानाही नगरमध्ये हा अवैध धंदा राजरोसपणे सुरू असून, यामुळे तरुण पिढीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन अनेक जण कर्करोगाच्या विळख्यात अडकले आहेत. रस्ते आणि सरकारी कार्यालयांच्या भिंती या मव्याच्या थुंकीने विद्रूप झाल्या असूनही स्थानिक अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या अवैध विक्रीला प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचे मूक समर्थन असल्याचे सांगत, शहरात येणारा हा गुटखा आणि मावा कुठून येतो याचा शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी भुतारे यांनी केली आहे.

# 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'च्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची नगरमध्ये ५ ते ७ जूनला बैठक

नगर - महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणी अहिल्यानगर येथे ५ ते ७ जून ला होत आहे. त्यानिमित्ताने व्याख्यान, पुस्तक प्रकाशन, पुस्तक प्रदर्शन तसेच प्रबोधन फेरीचे आयोजन केल्याची माहिती महा अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी दिली आहे.

अहिल्यानगर येथील श्री बडीसाजन मंगल कार्यालयात ५ जून रोजी राज्य कार्यकारिणी सुरू होईल. सकाळी १० वाजता उद्घाटन होईल. दिवसभर संघटनात्मक कार्याचा आढावा व चर्चा होईल. सायंकाळी ६ वाजता ज्येष्ठ संपादक, माजी खासदार कुमार केतकर यांचे व्याख्यान होणार आहे. हा व्याख्यानाचा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. मानसिक स्वास्थ्य,चार्वाक, उदंड झाले बुवा या तीन पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात उत्कृष्ट काम केलेल्या कार्यकर्त्यांचा गौरव केला जाईल. रात्री ७.३० ते ८.३० वाजता शहरातील सर्व पुरोगामी, डाव्या चळवळीतील लोकांचा स्नेह मेळावा होणार आहे.६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता शहरातून बुवाबाजी विरोधी संघर्ष प्रबोधन फेरीचे आयोजन केले आहे. सायंकाळी ६.३० वाजता अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे शतकवीर आणि लक्ष्यवेधी पुरस्काराने काही कार्यकर्त्यांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोमटे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आहे. तिन्ही दिवस पुस्तक प्रदर्शन राहील. राज्यभरातून ३०० हून अधिक प्रमुख पदाधिकारी या बैठकीस उपस्थित राहणार आहेत. या बैठकीचे नियोजन जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, प्रधान सचिव विनायक सापा, अध्यक्ष बाबासाहेब बुधवंत, उपाध्यक्ष प्रमोद भारुळे आदी कार्यकर्ते करीत आहेत.

# अशोक सानप यांचे आमरण उपोषण; माथाडी कामगाराला न्याय द्या

नगर - कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर येथील माथाडी कामगार अशोक किसन सानप यांच्यावर होत असलेल्या कथित अन्यायाविरोधात निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. उपोषणकर्ते अशोक सानप यांनी दिलेल्या निवेदनात माथाडी कामगार परवान्याच्या नूतनीकरणासाठी आवश्यक शिफारसपत्र व कागदपत्रे संबंधित कार्यालयांकडून दीर्घकाळ प्रलंबित ठेवण्यात आल्याचा आरोप केला आहे. तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता सभासदत्व रद्द करण्यात आल्याने रोजगारापासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



नोंदणीकृत माथाडी कामगार असूनही कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात काम करण्यास अडथळे निर्माण केले जात असल्याचा दावा करत शिफारसपत्राच्या अटीचा कायदेशीर आधार स्पष्ट करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. हमालांच्या वेतनातून विविध प्रकारच्या कपाती होत असताना वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळत नसल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच माथाडी कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या उपोषणात निर्भय महाराष्ट्र पार्टीच्या जिल्हाध्यक्षा शितलताई गोरे, शहरजिल्हाध्यक्ष मनोज कर्डीले, तालुका उपाध्यक्ष अविनाश अकोलकर, तालुका अध्यक्षा मीना खोमणे, तालुका संघटक सागर शेळके, अल्ताफ सय्यद, अमोल सानप, कपिल उल्हारे, सुभाष भोर, लक्ष्मण कांबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# केडगाव येथील अंबिकानगर परिसरात मध्यरात्री घरांवर दारूच्या बाटल्या फेकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न

### नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण; रात्रीची पोलीस गस्त वाढवावी : कठोर कारवाई करा

नगर - शहरातील केडगाव परिसरातील मनपा प्रभाग क्रमांक १६ मधील अंबिकानगर, दिघे वीटभट्टी परिसरात काही अज्ञात समाजकंटकांनी नागरिकांच्या घरांवर आणि कंपाऊंडमध्ये दारूच्या बाटल्या फेकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर यांच्या नेतृत्वाखाली कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष नितीन घोडके, प्रमोद शेजुळ, सुभाष लोळगे, राजेंद्र साबळे, चंद्रकांत पाटील, प्रज्योत देशमुख, सुजन क्षीरसागर यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.



अंबिकानगर परिसरात मध्यरात्री घरांवर दारूच्या बाटल्या फेकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने कोतवाली पोलिस ठाण्यात देण्यात आले. (छाया - लहू दळवी)

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ३ जून रोजी मध्यरात्री अंदाजे २ ते ३ वाजण्याच्या दरम्यान काही अज्ञात व्यक्तींनी अंबिकानगर परिसरातील घरांवर तसेच कंपाऊंडच्या आत दारूच्या बाटल्या फेकून त्यांची तोडफोड केली. या घटनेत काचेचे तुकडे घरांच्या आवारात तसेच परिसरात विखुरलेले आढळून आले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी या प्रकारामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अंबिकानगर हा शहरातील अत्यंत शांत, सुसंस्कृत आणि निवासी भाग म्हणून ओळखला जातो. या भागात प्रामुख्याने सुशिक्षित, नोकरी-व्यवसाय करणारे, कुटुंबवत्सल नागरिक वास्तव्यास आहेत. अशा परिसरात मध्यरात्री घडलेली ही घटना अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. या घटनेमुळे परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हा प्रकार केवळ मालमत्तेच्या नुकसानीपुरता मर्यादित नसून नागरिकांमध्ये दहशत आणि असुरक्षिततेची भावना निर्माण करणारा आहे. अशा समाजकंटक प्रवृत्तीच्या व्यक्तींवर वेळीच आळा घालणे आवश्यक असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे.

सुरज कोतकर म्हणाले की, अंबिकानगर परिसरातील नागरिक कायदेशीर प्रक्रियेत अडकण्यापेक्षा सुरक्षित वातावरणात राहण्यास प्राधान्य देतात. मात्र नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसरातील सर्व उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजची तातडीने तपासणी करण्यात यावी. संबंधित अज्ञात व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, अंबिकानगर तसेच प्रभाग क्रमांक १६ मधील निवासी भागात विशेषतः रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत नियमित आणि प्रभावी पोलीस गस्त वाढविण्यात यावी. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी परिसरात पोलीस उपस्थिती वाढविणे आवश्यक आहे. तसेच अंबिकानगर परिसरात गस्त घालण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे संपर्क क्रमांक स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच जबाबदार नागरिकांना उपलब्ध करून देण्यात यावेत. त्यामुळे कोणतीही संशयास्पद हालचाल, अनुचित प्रकार अथवा आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना तात्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधता येईल आणि वेळेत मदत मिळू शकेल. अंबिकानगर परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस आणि स्थानिक नागरिकांनी केली आहे. शांत आणि सुसंस्कृत परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या समाजकंटकांविरोधात कठोर पावले उचलून नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घ्यावा

### विश्व हिंदू परिषद, मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचे वतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन

नगर - राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाद्वारे प्रस्तावित महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ हा घटनाबाह्य व हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घेण्याबाबत विश्व हिंदू परिषद, मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचे वतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, श्री तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश पलंगे, दिनेश परदेशी, मनोहर भाकरे, मुकुल गंधे, अंबादास गोटीपामूल आदी उपस्थित होते.



हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घेण्याबाबत विश्व हिंदू परिषद, मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचे वतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात सांगितल्याप्रमाणे अहिल्यानगर मतदारसंघातील तसेच राज्यातील विविध हिंदू देवस्थान संस्था, मंदिर विश्वस्त, भाविक व महाराष्ट्र मंदिर महासंघ यांनी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६ या मसुद्याबाबत गंभीर आक्षेप व तीव्र चिंता व्यक्त केलेली आहे.

सदर प्रस्तावित कायद्यामुळे हिंदू देवस्थानांच्या इनाम जमिनीवरील पारंपरिक, धार्मिक व कायदेशीर हक्क संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली असून, मंदिरांच्या आर्थिक स्वायत्ततेवर व धार्मिक व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः संविधानातील अनुच्छेद १४,२५,२६ व ३००-अ अंतर्गत संरक्षित अधिकारांवर या मसुद्यामुळे गदा येत असल्याचे विविध कायदे तज्ज्ञ, धार्मिक संस्था व नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाने तयार केलेले सविस्तर निवेदन, कायदेशीर आक्षेप व मागण्या यांची प्रत सोबत जोडली आहे. आपण सदर विषयाची गांभीर्याने दखल घ्यावी. तसेच यासंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाने काही मागण्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६ हा प्रस्तावित मसुदा तात्काळ मागे घेण्यात यावा., संबंधित सर्व हिंदू देवस्थान संस्था, कायदे तज्ज्ञ व भाविक यांच्याशी व्यापक चर्चा केल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये., हरकती व सूचना सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी., देवस्थान जमिनींचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कठोर कायदेशीर यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

## सौ. पूनमबाई नवलानी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील रहिवासी सौ. पूनमबाई नवलानी (वय ५९, दर्शनकुंज, धर्माधिकारी मळा, सावेडी) यांचे ४ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. हेमंत नवलानी यांच्या त्या पत्नी तर गगन नवलानी, सोनल, भारती यांच्या आई होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# महापुरुषांबाबत आक्षेपार्ह पोस्टप्रकरणी डॉक्टरवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### सनद रद्द करून जिल्हाबंदीचे आदेश द्यावेत; कारवाई न झाल्यास आमरण उपोषण : पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर - महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नायक कांशीराम यांच्याविषयी सोशल मीडियावर कथितरित्या अपमानकारक व आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या भाळवणी (ता. पारनेर) येथील डॉ. मंगेश बेकारसे यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, त्यांची वैद्यकीय सनद रद्द करावी तसेच त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून जिल्हाबंदीचे आदेश जारी करावेत, अशी मागणी जनहितार्थ जन आक्रोश असोसिएशनतर्फे करण्यात आली आहे.

या संदर्भात संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सोशल मीडियावर करण्यात आलेल्या कथित आक्षेपार्ह पोस्टमुळे जिल्हाभरातील आंबेडकरी समाजामध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्तीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कांशीराम यांच्याबद्दल अपमानास्पद



मजकूर प्रसारित केल्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. या घटनेनंतर पारनेर तालुक्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच संबंधित व्यक्ती वारंवार पुरोगामी विचारसरणीविरोधात चिथावणीखोर वक्तव्य करत असून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील प्रेरणास्थान आहेत. अशा महापुरुषांबाबत अपमानास्पद वक्तव्ये किंवा पोस्ट करणे ही गंभीर सामाजिक विकृती असून अशा कृत्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

जनहितार्थ जन आक्रोश असोसिएशनने प्रशासनाकडे संबंधित व्यक्तीची वैद्यकीय व्यवसायाची सनद रद्द करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी जिल्हाबंदीचे आदेश जारी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या प्रकरणात तातडीने आणि कठोर कारवाई न झाल्यास समाजहितासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (मार्केट यार्ड), अहिल्यानगर येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### लिंबू पाणी कोणी प्यावे?

लिंबू पाणी उन्हाळ्यात सगळेच पितात, पण सिडिटीवाल्यांना प्रश्न पडतो की आंबट लिंबू पोटात जळजळ वाढवेल का कमी करेल. लिंबू चवीला आंबट असलं तरी पचल्यावर शरीरात अल्कलाईन परिणाम देतं, त्यामुळे सौम्य ॲसिडिटी, अपचन असणाऱ्यांना कोमट पाण्यात अर्धा लिंबू पिळून सकाळी प्यायल्याने आराम मिळू शकतो. ते पचन सुधारतं आणि गॅस कमी करतं. पण ज्यांना अल्सर किंवा तीव्र जळजळ आहे त्यांनी लिंबू पाणी टाळावं, कारण सायट्रिक सिडमुळे अन्ननलिकेचा त्रास वाढतो. साखर न घालता, चिमूटभर सैंधव मीठ टाकून जेवणाआधी ३० मिनिटे घ्या. ३-४ दिवस ट्राय करून बघा, त्रास झाला तर थांबा. रोज प्यायल्याने दात खराब होऊ शकतात म्हणून स्ट्रॉ वापरा. थोडक्यात, लिंबू पाणी सगळ्यांसाठी उपयोगी नाही, ॲसिडिटीचं मूळ कारण तळलेलं, तिखट जेवण किंवा ताण असेल तर फक्त लिंबू पाण्याने फरक पडणार नाही. रात्री झोपण्याआधी लिंबू पाणी पिऊ नका, झोपल्यावर ॲसिड वर येऊन जळजळ वाढू शकते. जर तुम्ही ॲसिडिटीसाठीची औषधे घेत असाल तर लिंबू पाणी घेण्याआधी डॉक्टरांना विचारून घ्या. लिंबू पाण्याने शरीर डिटॉक्स होतं हा गैरसमज आहे, किडनी आणि लिव्हर हेच नैसर्गिक डिटॉक्स करतात. मधुमेह असणाऱ्यांनी मध किंवा साखर न घालता फक्त लिंबू-पाणी घ्यावं.तुमच्या शरीराला सूट होत असेल तरच घ्यावे.

## पाककला

### पनीर अंगारा

**साहित्य :** २५० ग्रॅम पनीर, २ कांदे, ३ टोमॅटो, १० काजू, ८ लसूण, १ इंच आलं, २ टेबलस्पून बटर, १ चमचा तेल, १ टीस्पून जिरे, १ तेजपत्ता, २ टेबलस्पून काश्मिरी तिखट, १ टेबलस्पून कांदा-लसूण मसाला, १ टीस्पून कसुरी मेथी, १/२ टीस्पून गरम मसाला, मीठ, कोथिंबीर, क्रीम. स्मोकसाठी: १ निखारा + १ चमचा तूप.

**कृती :** पनीरला मीठ, लिंबू लावून बटरवर हलकं फ्राय करा. कांदा, टोमॅटो, काजू, आलं-लसूण परतून बारीक वाटून घ्या. कढईत बटर-तेलावर जिरे, तेजपत्ता टाका. वाटण टाकून तेल सुटेपर्यंत परता. गॅस बारीक करून तिखट, कांदा-लसूण मसाला टाका. १ मिनिट परता. अर्धा कप गरम पाणी, मीठ टाकून उकळा. पनीर, कसुरी मेथी, गरम मसाला टाका. ग्रेव्हीच्यामध्ये वाटी ठेवून तापलेला निखारा ठेवा, तूप सोडा, झाकण लावा. २ मिनिट धूर मुरू द्या. वरून क्रीम, कोथिंबीर घालून गरम सर्व्ह करा.

## वास्तू

### छताचा उतार

✻ जर आधीच चुकीच्या दिशेला उतार असेल आणि बदलणे शक्य नसेल तर नैऋत्य कोपऱ्यात जड वस्तू ठेवा किंवा ईशान्य कोपऱ्यात एक छोटा आरसा ४५ अंशात लावून ऊर्जा बॅलन्स करू शकता.

✻ गच्चीच्या मध्यभागी म्हणजे ब्रह्मस्थानात उतार करू नका. पाणी साठेल अशी रचना टाळा.

✻ पावसाचे पाणी जाण्याचे पाईप ईशान्य, उत्तर किंवा पूर्व दिशेलाच सोडा. दक्षिण किंवा पश्चिम दिशेला पाईप नको. पाण्याची टाकी नैऋत्य दिशेला आणि उंचावर असावी.

## सौंदर्य

✻ नखे चमकदार ठेवण्यासाठी रोज रात्री झोपताना ऑलिव्ह ऑईल किंवा खोबरेल तेल कोमट करून नखांना आणि क्यूटिकलला ५ मिनिट मसाज करा, त्यामुळे नखे तुटत नाहीत आणि वाढही चांगली होते.

✻ आठवड्यातून एकदा लिंबाच्या रसात नखे १० मिनिट बुडवून ठेवा, याने पिवळेपणा जाऊन नखांना नैसर्गिक चमक येते.

## सल्ला

मिठाच्या डबीत ५-६ कच्चे तांदळाचे दाणे किंवा २-३ लवंगा टाका. ते ओलावा शोषून घेतात आणि मीठ कोरडे राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ५ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, श्रवण अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामावरील त्रुटी कमी करा, दिवस अनुकूल आहे. कौटुंबिक खर्च वाढेल.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी तुमचा रूबाब राहील. तांत्रिक कामात चालढकल नको. गोड बोलून कार्यभाग साधाल.

**मिथुन :** जोडीदाराची मर्जी सांभाळा, गप्पांच्या ओघात गैरसमज नको. प्रवासात सावध रहा. हजरजबाबीपणा दाखवताना काळजी घ्या.

**कर्क :** अधिकारी लोकांची मर्जी राहील, स्त्री वर्गाचा हात लागेल. पत्नीच्या कमाईचा लाभ होईल. सहकार्यांशी जमवून घ्याल.

**सिंह :** व्यवसायात वाढ होईल, कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल. जिद्दीने कार्यरत राहाल. नवीन ओळखी होतील.

**कन्या :** दैनंदिन कामे मार्गी लागतील, आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. प्रॉपर्टीचे सौख्य लाभेल. प्रवास संभवतो.

**तुळ :** महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता, कोणाच्याही सहकार्याची अपेक्षा नको. खर्चावर नियंत्रण ठेवा. संयम बाळगा.

**वृश्चिक :** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल, नवीन परिचय होतील. नोकरीत समाधानकारक स्थिती राहील. शुभवार्ता मिळेल.

**धनु :** मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल, उत्साह वाढवणारी घटना घडेल. महादेवाचे दर्शन घ्या, बजरंगबलीची कृपा राहील.


**मकर :** कुटुंबासोबत फिरायला जाल, मन प्रसन्न राहील. नोकरी-व्यवसायात यश मिळण्याचे योग. महादेवाची कृपा राहील.

**कुंभ :** कामात बदल होतील, अनपेक्षित लाभ संभवतो. हाताखालील लोकांचे सहकार्य मिळेल. खर्च वाढेल पण आवाक्यात राहील.

**मीन :** वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता, नियोजन करा. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. कला क्षेत्रात संधी लाभेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२३९

सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) जुन्या काळातील एक दिवंगत संगीतकार तथा गायक ४) ++ काटकर (अभिनेत्री) ५) ++ दिया जाय या छोड दिया जाय बोल (गाणे) ६) पुनित +++ (याच्याशी फायटिंग करताना अमिताभ बच्चन जखमी झाला होता) ८) अनहोनी को होनी कर दे होनी को अनहोनी एक जगह जब ++ हो तीनों (गाणे) ९) 'सुलतान' चित्रपटाचा नायक १०) दिवंगत अभिनेता राजेश खन्नाचे टोपणनाव ११) + और मेरा हाथी (चित्रपटाचे नाव) १२) गीत ++ चल (चित्रपटाचे नाव) १३) चल उड जा रे ++++++

**उभे शब्द :-** १) जुन्या काळातील या अभिनेत्रीला 'ड्रीम गर्ल' अर्थात 'स्वप्न सुंदरी' असे म्हटले जाते २) +++ गौरव (अभिनेता) ३) 'लगान, राजा हिन्दुस्तानी, गजनी' आदी चित्रपटांचा नायक ४) ++ कुर्सी का (चित्रपटाचे नाव) ६) +++ धरम (चित्रपटाचे नाव) ७) राजेंद्रकुमार, वैजयंतीमाला यांचा एक चित्रपट ८) नया +++ (चित्रपटाचे नाव) १२) मान ++ उस्ताद (चित्रपटाचे नाव)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** जे हातात आहे त्यात आनंद माना, जे नाही त्यासाठी प्रयत्न करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### ब्लॅक होल म्हणजे काय?

ब्लॅक होल म्हणजे अवकाशातील अशी एक जागा जिथे गुरुत्वाकर्षण इतके प्रचंड असते की तिथून प्रकाश सुद्धा बाहेर पडू शकत नाही. म्हणून त्याला काळे विवर किंवा कृष्णविवर म्हणतात. ब्लॅक होल तयार कसे होते हे समजण्यासाठी ताऱ्याचे जीवनचक्र समजून घ्यावे लागेल. आपल्या सूर्यापेक्षा किमान २० पट मोठा तारा जेव्हा त्याचे सर्व इंधन संपवतो, तेव्हा त्याच्या केंद्रातील आण्विक प्रक्रिया थांबते. आतून बाहेर ढकलणारा दाब संपला की ताऱ्याचे स्वतःचेच गुरुत्वाकर्षण त्याला आत ओढू लागते. हा तारा एका मोठ्या स्फोटाने फुटतो, त्याला सुपरनोव्हा म्हणतात. स्फोटानंतर उरलेले केंद्र जर खूप जड असेल, तर ते सतत आकुंचन पावत जाते. त्याचे वस्तुमान एका अतिशय लहान बिंदूत एकवटते. या बिंदूला सिंग्युलॅरिटी म्हणतात. सिंग्युलॅरिटीची घनता अनंत असते आणि आकार जवळजवळ शून्य. तिथे आपल्याला माहित असलेले भौतिकशास्त्राचे नियम लागू पडत नाहीत.

वेळ आणि अवकाश दोन्ही तिथे वाकतात. ब्लॅक होलला एक सीमा असते, तिला इव्हेंट होरायझन म्हणतात. ही एक काल्पनिक मर्यादा आहे. या सीमेच्या आत गेलेली कोणतीही गोष्ट, मग ती प्रकाश असो वा माहिती, परत कधीच बाहेर येऊ शकत नाही. इव्हेंट होरायझनचा आकार ब्लॅक होलच्या वस्तुमानावर ठरतो. जेवढे वस्तुमान जास्त, तेवढा इव्हेंट होरायझन मोठा. या सीमेपलीकडून आपण ब्लॅक होलला पाहू शकत नाही, म्हणून तो काळा दिसतो. ब्लॅक होल तीन मुख्य प्रकारचे असतात. स्टेलर ब्लॅक होल हे मेलेल्या मोठ्या ताऱ्यांपासून बनतात. यांचे वस्तुमान सूर्याच्या ५ ते १०० पट असते. सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल हे आकाशगंगांच्या मध्यभागी असतात. यांचे वस्तुमान सूर्याच्या लाखो ते अब्जावधी पट असते.

आपल्या आकाशगंगेच्या, मिल्की वे च्या मध्यभागी Sagittarius नावाचा सुपरमॅसिव्ह ब्लॅक होल आहे. तिसरा प्रकार म्हणजे प्रायमॉर्डियल ब्लॅक होल. हे विश्वाच्या सुरुवातीला तयार झाले असावेत असे शास्त्रज्ञ मानतात. हे आकाराने खूप लहान असू शकतात. ब्लॅक होल दिसत नसले तरी शास्त्रज्ञ त्यांचा शोध घेतात. ब्लॅक होल जवळच्या ताऱ्यांना आणि वायूला आपल्याकडे ओढतो. तो वायू खूप वेगाने फिरताना प्रचंड तापतो आणि क्ष-किरण सोडतो. या क्ष-किरणांमुळे आपल्याला ब्लॅक होलची जागा कळते. २०१९ मध्ये इव्हेंट होरायझन टेलिस्कोपने पहिल्यांदाच M87 आकाशगंगेतील ब्लॅक होलचा फोटो काढला. त्यात काळ्या भागाभोवती केशरी प्रकाशाचे कडे दिसते.

तो प्रकाश म्हणजे ब्लॅक होलमध्ये पडणारा तापलेला वायू.ब्लॅक होलमध्ये वेळ मंदावते. आइन्स्टाईनच्या सापेक्षतावादानुसार, जिथे गुरुत्वाकर्षण जास्त तिथे वेळ हळू जाते. जर तुम्ही ब्लॅक होलजवळ गेलात तर तुमच्यासाठी १ तास म्हणजे पृथ्वीवरची अनेक वर्षे असतील. स्टीफन हॉकिंग यांनी सिद्ध केले की ब्लॅक होल पूर्णपणे काळे नसतात. क्वांटम परिणामांमुळे ते हळूहळू ऊर्जा बाहेर टाकतात, त्याला हॉकिंग रेडिएशन म्हणतात.

यामुळे खूप मोठ्या कालावधीत ब्लॅक होल बाष्पीभवन होऊन नष्ट होऊ शकतात. ब्लॅक होलला केस नसतात असे म्हणतात. म्हणजे ब्लॅक होलला फक्त तीन गोष्टींनी ओळखता येते: वस्तुमान, विद्युत भार आणि परिभ्रमण. तो कशापासून बनला आहे हे माहिती इव्हेंट होरायझनमध्ये गेल्यावर नष्ट होते.ब्लॅक होल भितीदायक वाटत असले तरी ते विश्वासाठी महत्त्वाचे आहेत. आकाशगंगांच्या निर्मितीत आणि ताऱ्यांच्या जन्मात त्यांचा मोठा वाटा आहे. ते अवकाशातील व्हॅक्यूम क्लीनरसारखे काम करतात.

### सर्वांचा आदर


एका जंगलात चंदू नावाचा कोल्हा राहत होता. तो खूप हुशार होता पण त्याला इतर प्राण्यांची चेष्टा करायला आवडायची. रोज तो सशाला म्हणायचा, अरे तुझे कान एवढे मोठे, तुला सगळ्यांचे बोलणे ऐकू येते का? ससा रडवेला व्हायचा. कासवाला बघून हसायचा, अरे तू चालतोस की झोपत झोपत जातोस? तुझ्यापेक्षा गोगलगाय बरी. कासव गप्प बसायचे. हत्तीला म्हणायचा, एवढा मोठा शरीर, पण डोकं छोटं. उंदीर बघितला की घाबरतोस. सगळे प्राणी त्याला कंटाळले होते.एक दिवस जंगलात शिकारी आले. त्यांनी जाळे पसरले. चंदू कोल्हा मस्तीत धावत होता आणि नेमका जाळ्यात अडकला.

तो जोरात ओरडू लागला, वाचवा रे, कोणीतरी वाचवा. पण कोणीच आले नाही. सगळ्यांना वाटले हा परत चेष्टा करतोय. शेवटी कासव हळू हळू चालत तिथे आले. त्याने आपल्या कडक पाठीने जाळे तोडायला सुरुवात केली. ससा आणि हत्ती पण मदतीला आले. सशाने दाताने जाळ्याच्या दोऱ्या कुरतडल्या. हत्तीने सोंडेने जाळे उचलून फेकले. चंदूची सुटका झाली. चंदूला खूप लाज वाटली.

तो म्हणाला, मी तुमची रोज चेष्टा करायचो, तरी तुम्ही मला वाचवले. मला माफ करा.कासव म्हणाले, चूक कळली हेच महत्त्वाचे. प्रत्येकात काही ना काही गुण असतो. दुसऱ्याला कमी लेखू नये. तेव्हापासून चंदूने कोणाचीच थट्टा केली नाही. तो सगळ्यांशी चांगला वागू लागला आणि जंगलात आनंदाने राहू लागला.

बोध : दुसऱ्याची चेष्टा करणे सोपे असते, पण अडचणीत मदत करणारेच खरे मित्र असतात. प्रत्येकाचा आदर करा.

## आत्मशक्ति



### जागृत आत्म्याचे गुण

आमच्या अंतरी भरपूर खजिने भरलेले आहेत. जगातील सर्व खजिने एकत्र केले तरी, अंतरीय खजिने त्याहून अधिक भरतील. सर्व प्रकारचे ज्ञान उपलब्ध होईल एवढ्या ज्ञानाचे स्रोत अंतरी भरलेले आहेत. आमच्या अंतरी तुडुंब प्रेम भरलेले आहे. व ते आमची वाट पहात आहे. जगातील कोणत्याही प्रेमापेक्षा ते अधिक सुखदायी, अधिक उत्तम आहे. आमच्या अंतरी भव्य-दिव्य शक्ति व ऊर्जा आहे. ती आम्हाला भीतीवर विजय प्राप्त करण्यासाठी समर्थ बनविते. आम्ही जरी वेगवेगळे दिसत असलो, तरीपण एकाच परमेश्वराशी जोडले गेलो आहोत. आमचे अंतःकरण प्रेमाने धुंद झाले आहे व ते सुखाने इतके भरले गेले आहे की, बाहेरील कोणत्याही सुखाची आम्हाला गरज वाटणार नाही. अशा या सर्व देणग्या आमच्या जागृत आत्म्यामध्ये आहेत.

आमचा आत्मा प्रेमाने, शक्तीने व विवेकाने ओतप्रोत भरलेला आहे. परंतु आम्हाला या धनाची जाणीव नाही; कारण आमच्या आत्म्यावर मन, इंद्रिये आणि शरीराने ताबा मिळवला आहे. जेव्हा आत्मा, मन आणि शरीराचे स्वाधीन होतो तेव्हा तो स्वतःलाच विसरुन जातो. परंतू जागृत आत्माच आमचे सत्य स्वरुप आहे. आमच्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. तिचा फायदा घेऊन आम्ही आत्मानुभव घ्यावा. असे झाल्यास अंतरीच्या सर्व खजिन्यांनी आमचे जीवन संपन्न होईल!

आत्म्याच्या संदर्भात आम्ही दोन दृष्टीकोनांनी स्वतःकडे बघू शकतो. सुरुवातीला आम्ही स्वतःला मन अथवा शरीर समजतो. ह्या दृष्टीकोनातून आम्ही स्वतःला मन आणि शरीरच समजू लागतो व त्यांतच आत्म्याचा प्रवास आहे, असे समजतो. दुसरा दृष्टीकोन म्हणजे स्वतःला आत्मा म्हणून समजणे; हा होय. तेव्हा आम्ही स्वतःला मन आणि शरीर धारण केलेला आत्मा समजतो.

हे पुस्तक लिहिण्यामागे अनेक उद्देश आहेत. आम्ही स्वतःकडे कोणत्या दृष्टीने पहावे, ह्याचा शोध घेणे हा त्या उद्देशांपैकी एक उद्देश आहे. जर आम्ही स्वतःला आणि शरीर समजले; तर आत्मबोध घेण्यासाठी आम्हाला पुढे वाटचाल करावी लागेल. जर आम्ही स्वतःला 'आत्मा' असे मानले तर ह्या जगांत काम करण्यासाठी आम्हांला मन आणि शरीर दिलेले आहे, त्याचा उपयोग करून आमचा आत्मा

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : 'मी कोण आहे' याचं स्मरण ठेवण्यातच माझी सुरक्षितता आहे.

शिवानीदीदी : 'मी कोण आहे' आणि 'माझी जबाबदारी काय आहे' हे सत्य नेहमीच लक्षात ठेवायला हवं.

मला स्वतःला बघायचं आहे... हे शरीर, माझा एका आत्म्याचा पोशाख आहे... बोलणं, ऐकणं आणि चालणं या इंद्रियांवर माझी, आत्म्याची पकड आहे... मी, आत्मा, हाच मालक आहे... हे शरीर माझ्या इच्छेप्रमाणे काम करेल... आज मी जे काही करेन, ते करताना मी माझा मूळ स्वभाव लक्षात ठेवेन... ह्या जन्मात मी भूमिका, पद आणि नाती मिळवली आहेत... पण हे सगळं करणारा... मी, एक आत्मा...

### ध्यान आणि चिंतन

आज मी ज्या कोणाला भेटेन, ती एखाद्या पदाची दुसऱ्या पदाला, एखाद्या भूमिकेची दुसऱ्या भूमिकेला किंवा एखाद्या स्तराची दुसऱ्या स्तराला अशी भेट असणार नाही... मी फक्त स्वतःवर लक्ष देईन... जेव्हा मी, एक आत्मा, दुसऱ्या आत्म्याला भेटेन तेव्हा 'मी एक प्रेमळ आत्मा आहे' हे मी लक्षात ठेवेन... माझ्या समोर असलेला आत्मा योग्य वर्तन करत नसेल तरी मी फक्त माझ्याकडे लक्ष देईन... मला समजतं की, दुसरा आत्मा दुःखात आहे... मला काय द्यायचं आहे याची समज आज मला आहे... मी प्रेम, करुणा आणि समजेचा प्रसार करतो... मी सहज भावाने प्रेमळ अस्तित्व आहे... ओम शांती!

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

जेव्हा आपल्याला आपल्या पदाची, भूमिकेची किंवा नात्यांची जाणीव असते तेव्हा इतरांनी आपल्याशी त्यानुसार वागावं अशी आपली अपेक्षा असते. जेव्हा आपल्याला आपल्या अपेक्षेअनुसार मिळत नाही तेव्हा आपण चिडतो किंवा दुखावले जातो.

आपण एक आत्मा आहोत आणि दुसऱ्या आत्म्याशी संवाद साधताना आपल्या खऱ्या चेतनेमध्ये आपण असायला हवं.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मी : साहेब, पगारवाढ करा ना. बॉस : तू कंपनीसाठी काय केलंस?

मी : साहेब, मी वेळेवर येतो.

बॉस : तेच तर प्रॉब्लेम आहे... काम करणारे उशिरा येतात.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताचा राष्ट्रध्वज कोणी तयार केला?

– पिंगली व्यंकय्या

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

रक्ताची कमतरता (निमिया) असणाऱ्या रुग्णांनी नियमितपणे रोज दोन टोमॅटो खावेत. यामुळे रक्ताचे प्रमाण प्राकृत होण्यास मदत होते.

६) टोमॅटोच्या एक कप रसामध्ये १,००० इ.यु. 'अ' जीवनसत्त्व असते. तसेच 'क' जीवनसत्त्वही भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे यकृताच्या विकारांमध्ये टोमॅटोचा रस गुणकारी आहे.

७) टोमॅटोमध्ये मलिक आणि सायट्रिक ॲसिड भरपूर प्रमाणात असल्याने टोमॅटो खाल्ल्याने लहान व मोठे आतडे अधिक कार्यक्षम होते व शरीरात साचलेला घट्ट मल पुढे ढकलण्यास मदत होते, म्हणून मलावरोधाची तक्रार असणाऱ्यांनी टोमॅटोचे सेवन नियमितपणे करावे.

१०) पिकलेल्या टोमॅटोचा ताजा रस लहान मुलांना दोन ते तीन वेळा प्यायला दिल्यास मुले निरोगी, बलवान व सुदृढ होतात.

### टोमॅटो

११) टोमॅटोच्या रसात अर्जुनसाल चूर्ण व साखर घालून अवलेह बनवून तो नियमिपणे खाल्ल्यास हृदयविकार कमी होतो.

टोमॅटो आरोग्यास लाभदायक असतो; तरी मूतखडा, संधिवात, आमवात व आम्लपित्त असणाऱ्या रुग्णांनी टोमॅटो सेवन करू नये.

### घोसाळे

घोसाळे ही भाजी फार प्राचीन असून, मूळची भारतातीलच आहे. गर्द हिरव्या रंगाची त्वचेवर काळसर ठिपके असलेली, आकाराने लांबट गोल असलेली घोसाळी ही भाजी आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. संपूर्ण जगभरात हिचे उत्पन्न घेतले जाते. भारत, इंडोनिशया, मलेशिया, फिलिपाईन्स व कॅरेबियन बेटे, अमेरिका या सर्व देशांमध्ये घोसाळ्याची लागवड पुष्कळ प्रमाणात केली जाते. घोसाळे हे पीक घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची जमीन चालते. घोसाळे ही वेलीवर येतात. हा वेल खूप पसरतो म्हणून तो मांडवावर चढवतात. मांडवावर चढवल्यामुळे घोसाळी चांगली येतात. या वेलावर पिवळ्या रंगाची फुले येतात व या वेलावर येणाऱ्या फळाला घोसाळे असे म्हणतात. मराठीत 'घोसाळे', इंग्रजीत 'लुफा' संस्कृतमध्ये 'स्वादुकोष्ठकी', तर शास्त्रीय भाषेत 'लुफा एजिपटियासा' या नावाने ओळखले जाणारे घोसाळे 'कुकरबिटेसी' या कुळातील आहे.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




जागतिक सायकल दिनानिमित्त विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली काढण्यात आली.

# जागतिक सायकल दिनानिमित्त विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

### इंधन बचत, निरोगी आरोग्य व प्रदूषणमुक्तीसाठी सायकलचा वापर करण्याचा संदेश

नगर – मेरा युवा भारत अहिल्यानगर आणि श्री नवनाथ युवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे नवनाथ विद्यालयात जागतिक सायकल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी गावातून सायकल रॅली काढून पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश दिला.

विद्यालय परिसरातून मुख्याध्यापक उत्तम कांडेकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीला प्रारंभ करण्यात आले. याप्रसंगी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, उपशिक्षक शरद भोस, मंदा साळवे, स्वाती इथापे, तृप्ती वाघमारे, प्रमोद थिटे, निकिता रासकर–शिंदे, श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष पै. संदीप डोंगरे, प्रशांत जाधव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

सायकल रॅलीचे गावातील प्रमुख रस्त्यांवरून उत्साहात मार्गक्रमण झाले. विद्यार्थ्यांनी सायकल चालवा–आरोग्य जपा, इंधन वाचवा–देश वाचवा, प्रदूषणमुक्त पर्यावरणासाठी सायकलचा वापर करा अशा घोषणा दिल्या. या रॅलीमुळे ग्रामस्थांचे लक्ष वेधले गेले असून पर्यावरणपूरक वाहतुकीचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात सायकलचे आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. वाढते वाहन प्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि बदलते पर्यावरणीय संतुलन यामुळे सायकलचा वापर ही काळाची गरज बनली असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. दैनंदिन जीवनात शक्य तितक्या वेळा सायकलचा वापर केल्यास आरोग्य सुधारण्याबरोबरच पर्यावरणाचे संरक्षणही होऊ शकते, असा संदेश देण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी सायकल चालविण्याचा संकल्प करत पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमास मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष आणि रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, सायकल हे केवळ वाहतुकीचे साधन नसून निरोगी जीवनशैलीचे प्रतीक आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि वाढत्या प्रदूषणाच्या समस्येमध्ये सायकलचा वापर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. सायकलमुळे इंधनाची बचत होते, पर्यावरणाचे रक्षण होते आणि शारीरिक आरोग्यही उत्तम राहते. विद्यार्थ्यांनी आज दिलेला संदेश समाजासाठी प्रेरणादायी आहे. प्रत्येक नागरिकाने शक्य तितक्या वेळा सायकलचा वापर करण्याचे त्यांनी आवाहन केले.

मुख्याध्यापक उत्तम कांडेकर म्हणाले की, जागतिक सायकल दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून पर्यावरण आणि आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजविणे ही शाळेची सामाजिक जबाबदारी आहे. सायकलचा नियमित वापर केल्यास शारीरिक तंदुरुस्ती वाढते, मानसिक आरोग्य सुधारते आणि प्रदूषण कमी करण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी आज दिलेला संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुःख दूर नेतो, तो हरी

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




हरिपाठ रोज करावा. हरण करतो तो हरी. दैन्य, दुःख, दारिद्य जो दूर नेतो. तो हरी. हरिपाठ केल्याने आपण स्वतःच हरिमय होतो. आपले नव्हे, तर इतरांचेही दुःख दूर सारण्याला प्रवृत्त होतो. जे ओठात, ते पोटात, जे पोटात तेच रक्तात. जसे रक्त तशी प्रवृत्ती. प्रवृत्ती देते युक्ती. युक्तीमुळे मिळते मुक्ती. संकटातून सुटका.

एक गोष्ट आहे पुराणातली. एक हरदत्त होता. तो 'हरी–हरी' म्हणायचा. एक देवदत्त होता तो 'घरी घरी' म्हणायचा. गावात एक दानशूर आला. त्याने दान वाटायला सुरुवात केली. हरदत्त 'हरी–हरी' म्हणाला. दान दूर नेले गेले. देवदत्त 'घरी घरी' म्हणाला. दान त्याच्या घरी पोहोचले.

हरदत्ताला वाईट वाटले नाही. देवदत्त सुखावला. तो 'हरी–हरी' म्हणणाऱ्या हरदत्ताला हसला. चालत आलेले धन दूर गेले, म्हणून हरदत्ताच्या बायकोला वाईट वाटले.

एक दिवस गावात दोन–तीन अनोळखी माणसे धावपळ करीत आली. त्यांच्या डोक्यावर गाठोडी होती. त्यातील हिरे–माणके चमकत होती. हरदत्ताला ती माणसे म्हणाली, ही गाठोडी घ्या.' हरदत्त 'हरी–हरी' म्हणाला. ती हिरमुसली. आणखी धावपळ सुरू झाली त्यांनी. त्यांना देवदत्त भेटला. ती माणसे म्हणाली, घ्या ही गाठोडी. देवदत्त म्हणाला, घरी घरी. ती देवदत्तच्या घरी गेली. गाठोडी त्याच्या घरी ठेवून अंधारात पसार झाली. देवदत्ताने गाठोडी सोडली. सोन्या–चांदीची आणि हिऱ्या माणकांची रास उभी झाली. देवदत्त आनंदला.

पण क्षणात राजाचे सेवक त्याच्या घरी आले. चोर म्हणून त्यांनी त्याला पकडून नेले. ते राजाचे चोरलेले दागिने होते. देवदत्ताच्या घरी दुःख आले. बंदिवासापायी दैन्य नशिबी आले. हरदत्त मात्र 'हरी–हरी' करीत सुखाने जीवन जगत होता.

'हरी हरी' रोज म्हटले की होते चांगले करण्याची सवय. 'हरी–हरी' हा आहे ताल. त्यामुळे जीवन होते लयमय. तालावर, लयीत वागण्याची सवय लागली, म्हणजेच जीवनाला शिस्त आली. शिस्त करते आळसाला फस्त.. मग कोठे राहिला माणूस सुस्त ? मग जीवन होते मस्त.

– किशोर गांधी

# 'संविधानाने जगण्याचा संदेश स्वीकारा' जातीवादाला थारा देता कामा नये

### कुमारसिंह वाकळे यांचे प्रतिपादन; ज्ञानदीप फाऊंडेशन व सीयोन चर्चच्या संयुक्त विद्यमाने प्रबोधन कार्यक्रम; न्याय, समता आणि बंधुतेचा संदेश



ज्ञानदीप फाऊंडेशन आणि सीयोन चर्च यांच्या संयुक्त विद्यमाने बोल्हेगाव येथील मोरया पार्क फेज–२ परिसरात संविधान जागर व प्रबोधन कार्यक्रम नगरसेवक कुमारसिंह वाकळे यांच्या उपस्थितीत झाला.

नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि संविधानिक मूल्यांच्या आधारे समाज परिवर्तनाचा मार्ग दाखविला. मात्र आज शिक्षण घेतलेली माणसेही व्यक्तीच्या गुणवत्तेपेक्षा त्याची जात शोधण्याचा प्रयत्न करतात, ही दुर्दैवी बाब आहे. देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी जातीवादाला थारा देता कामा नये. माणुसकी आणि संविधान या दोन मूल्यांच्या आधारे समाज सक्षम होऊ शकतो, असे नगरसेवक कुमारसिंह वाकळे म्हणाले. भारतीय संविधानाचा मूलभूत संदेश समजून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

भारतीय संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता या मूलभूत मूल्यांचा प्रचार–प्रसार करण्यासाठी ज्ञानदीप फाऊंडेशन आणि सीयोन चर्च यांच्या संयुक्त विद्यमाने बोल्हेगाव येथील मोरया पार्क फेज–२ परिसरात संविधान जागर व प्रबोधन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात फुले–शाहू–आंबेडकरी विचारसरणीचे कार्यकर्ते, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी परिसरात अशोक चक्र असलेला निळा ध्वजाला अभिवादन करण्यात आले. संविधान, सामाजिक समता आणि सर्वधर्मसमभाव या संकल्पनांवर आधारित या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी विचार मांडले. अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला नगरसेवक कुमारसिंह वाकळे, कॉ. अनंत लोखंडे, पास्टर प्रशांत चक्रनारायण, फादर अनिल कसबे, सुमेध गायकवाड, ज्ञानदीप फाऊंडेशनचे अध्यक्ष कॉ. पंकज लोखंडे, सुनिल भालेराव, राजेंद्र लोखंडे, माया जाधव, सारिका गागर्डे, ज्योती साठे, जयश्री गायकवाड, लतिका कसबे, प्रियांका साळवे, शारदा गायकवाड, निलेश चक्रनारायण, पास्टर गणेश लावरे, अभिमन्यू साळवे, जावेद सय्यद, दिलशाद अन्सारी, सनी साळवे, आकाश दळवी, प्रा. प्राजक्ता लोखंडे, क्लेरा लोखंडे, नितीन साठे, बाळासाहेब गायकवाड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना फादर अनिल कसबे यांनी देशातील अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. संविधानाने दिलेल्या अधिकारांचे संरक्षण सर्व घटकांना समानपणे मिळाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. सामाजिक ऐक्य आणि संविधानिक मूल्यांच्या बळावरच सर्व समाजघटकांना न्याय मिळू शकतो, असे त्यांनी सांगून ख्रिस्ती समाजाला संरक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली.

ज्ञानदीप फाऊंडेशनचे अध्यक्ष कॉ. पंकज लोखंडे यांनी स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गीतांवर आकर्षक लेझीम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या सांस्कृतिक सादरीकरणाला उपस्थितांकडून दाद मिळाली.

नगरसेवक कुमारसिंह वाकळे यांनी भारतीय संविधानाचा मूलभूत संदेश समजून घेण्याचे आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि संविधानिक मूल्यांच्या आधारे समाज परिवर्तनाचा मार्ग दाखविला. मात्र आज शिक्षण घेतलेली माणसेही व्यक्तीच्या गुणवत्तेपेक्षा त्याची जात शोधण्याचा प्रयत्न करतात, ही दुर्दैवी बाब आहे. देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी जातीवादाला थारा देता कामा नये. माणुसकी आणि संविधान या दोन मूल्यांच्या आधारे समाज सक्षम होऊ शकतो, असे ते म्हणाले.

अशोक गायकवाड यांनी जातीवाद आणि धर्माधारित राजकारणावर कठोर टीका केली. प्रत्येक व्यक्तीची जात शोधण्याची प्रवृत्ती ही समाजाला मागे नेणारी आहे. धर्माच्या नावावर राजकारण करणे देशासाठी घातक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देश एकसंघ ठेवण्यासाठी संविधानाची निर्मिती केली. मात्र आज जातीय ध्रुवीकरण वाढवून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी जातीनिहाय जनगणनेची गरज व्यक्त केली. देशातील विविध घटकांचे प्रमाण आणि त्यांच्या हक्कांचे योग्य वाटप निश्चित करण्यासाठी अद्ययावत जातीनिहाय जनगणना होणे आवश्यक आहे. जुन्या आकडेवारीच्या आधारे धोरणे ठरविणे योग्य ठरणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कॉ. अनंत लोखंडे यांनी सर्व धर्मांच्या केंद्रस्थानी माणुसकी असल्याचे सांगितले. धर्म कोणताही असो, तो प्रेम, करुणा आणि बंधुभाव शिकवतो. मात्र आज धर्माचा वापर अनेकदा राजकारणासाठी केला जात आहे. शेवटी माणसाच्या आयुष्यात टिकून राहते ती त्याची माणुसकी. त्यामुळे परस्परांमध्ये प्रेम, सन्मान आणि बंधुभाव वाढविण्याची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले.

पास्टर प्रशांत चक्रनारायण यांनी कोरोना काळातील सामाजिक ऐक्य आणि परस्पर सहकार्याची भावना आज पुन्हा दृढ करण्याची गरज असल्याचे सांगितले. समाजातील सर्व घटकांना समान न्याय आणि संरक्षण मिळाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून संविधानातील मूल्यांचा प्रसार, सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला. उपस्थितांनी संविधानिक मूल्यांचे जतन आणि संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहिमेंतर्गत २८ जून रोजी सर्व बालकापर्यंत पोलिओचा डोस पोहोचविण्याचे उद्दिष्ट



राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरीय कृती दलाची नियोजन बैठक उपायुक्त मेहर लहारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. (छाया – लहू दळवी)

नगर – राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन मोहिमेअंतर्गत २८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त मेहर लहारे यांनी दिली. शहरातील एकही बालक पल्स पोलिओच्या डोसपासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले असून शेवटच्या घटकातील बालकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरीय कृती दलाची नियोजन बैठक उपायुक्त मेहर लहारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध विभागांच्या समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शिक्षण अधिकारी पठाण, डॉ. दिलीप बागल, डॉ. वृषाली आरु, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरचे माजी अध्यक्ष सुनील कटारिया, डॉ. उज्वला शिरसाट, डॉ. रणजीत सत्रे, डॉ. समीर होळकर, जायंटस ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे संजय गुगळे, प्रतिभा राऊत, सुमित जाधव, शिल्पा ठोंबरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपायुक्त मेहर लहारे म्हणाले, पोलिओमुक्त भारताचे उद्दिष्ट कायम राखण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत पल्स पोलिओचा डोस पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिका, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून प्रभावी जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. शहरातील सर्व पोलिओ बूथ, फिरती पथके आणि विशेष मोहिमांद्वारे लाभार्थी बालकांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले, राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम ही बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मोहीम आहे. महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील सर्व पोलिओ बूथचे नियोजन पूर्ण करण्यात आले असून आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व स्वयंसेवकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. शहरातील एकही बालक पल्स पोलिओच्या डोसपासून वंचित राहू नये यासाठी विशेष भर दिला जाणार आहे. पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओचा डोस देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. वृषाली आरु यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेबाबत सविस्तर माहिती देत मोहिमेचे स्वरूप, लाभार्थी बालकांची संख्या, पोलिओ बूथचे नियोजन, आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती, जनजागृती उपक्रम तसेच विशेष पथकांच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकाला पोलिओचा डोस देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

२८ जून रोजी आपल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना जवळच्या पोलिओ केंद्रावर घेऊन जाऊन पल्स पोलिओचा डोस अवश्य द्यावा आणि पोलिओमुक्त भारताच्या अभियानात सहभागी व्हावे, आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील पै. नाना डोंगरे यांचा 'महाराष्ट्र नायक' राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव



बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था व संत कबीर बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पै. नाना डोंगरे यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था व संत कबीर बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पै. नाना डोंगरे यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. नाशिक रोड येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हृद्यरोग तज्ञ डॉ. अनिरुध्द धर्माधिकारी व मॉडेल रितिका साळुंखे यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्य आयोजक भूषण सरदार, मॉडेल स्मिता माटेकर, अभिनेते डॉ. गणेश व्यवहारे, लेखिका अश्विनी सांगळे, वैशाली सोनवणे, राजेंद्र हेलोडे आदी उपस्थित होते.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.

महिला बचत गट मेळावे, युवा संमेलने, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनातून ग्रामीण समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच सहा ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत.

# जनगणना ब्रँड अँबेसिडर म्हणून डॉ. अमोल बागुल यांची निवड



नगर – दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिक विजेते कलाकार डॉ. अमोल बागुल यांची भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत जनगणना ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड व नियुक्ती करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून जनजागृती मोहिमेला व्यापक स्वरूप देण्यात येत आहे.

या उपक्रमांना मुख्य जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, प्र. उपायुक्त शहाजान तडवी, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, जनगणना विभाग प्रमुख राकेश कोतकर तसेच सर्व प्रभाग अधिकारी, सर्व मास्टर ट्रेनर व पर्यवेक्षक यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

# बाई इचरचबाई फिरोदिया प्रशाला ते जिल्हा वाचनालय गल्ली रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ



नगर – शहरातील बाई इचरचबाई फिरोदिया प्रशाला ते जिल्हा वाचनालय गल्ली या परिसरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत जेसीबीसमोर नारळ फोडून भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी नागरिकांनी दीर्घकाळ रखडलेल्या कामाला अखेर सुरुवात झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी माजी नगरसेवक विक्रम राठोड यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच गिरीश जाधव यांच्या पुढाकारातून महापालिकेकडून या कामास मंजुरी मिळाली. गेल्या अनेक वर्षांपासून खराब झालेल्या रस्त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. कार्यक्रमास विक्रम राठोड, गिरीश जाधव, जालना येथील नगरसेवक अमोल ठाकूर, विलास गंधर्व, सागर शेळके, भालचंद्र मांबरे, सुरज शिंदे, निलेश धायगुडे, विष्णू क्षीरसागर, राहुल गांधी, विलास गोरे, गणेश गोरे, धम्मपाल चव्हाण, संजीव योगेश, जितेंद्र भोसले, उमेश मुंडे, विजय संजय, भरत सोनवणे, सागर धुमाळ, नंदू शेळके, अनंत गायकवाड आणि प्रकाश गोरे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी रस्त्याच्या कामाचा दर्जा चांगला ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच परिसरातील इतर प्रलंबित नागरी सुविधांच्या प्रश्नांकडेही महापालिकेने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली. नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर या कामाला सुरुवात झाल्याने परिसराच्या विकासाला चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# एससी उपवर्गीकरणाविरोधात आंबेडकरी समाजाचे रणशिंग; १५ जून रोजी होणाऱ्या 'लाँग मार्च'साठी अहिल्यानगर सज्ज

**शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथील बैठकीत नियोजन; संविधान रक्षणासाठी आरपारच्या संघर्षाचा इशारा, उपवर्गीकरणाच्या विरोधात एकजुटीचा निर्धार; जातीय फूट पाडण्याचा डाव हाणून पाडण्याचा इशारा**

नगर – अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड येथून १० जून रोजी सुरू होणारा राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात दाखल होणार असून, या लाँग मार्चचे स्वागत करण्यासाठी आणि समाजबांधवांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. टिळक रोड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे विजय भांबळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस एन. एम. पवळे, प्रा. निवृत्ती आरु, संजय कांबळे, राजीव साळवे, बुद्धानंद धांडोरे, महेंद्र मोहिते, राजेंद्र करंदीकर, यशराज शिंदे, अविनाश भोसले, विवेक भिंगारदिवे, कृपाल भिंगारदिवे, संदीप वाघमारे, अमरराम निरभवणे, अनिल इंगळे, शेखर पंचमुख, विजय गायकवाड, शिवाजी भोसले, विलास साठे, रावसाहेब कानडे, बाळासाहेब पातारे, सूरज बोरुडे, प्रा. एल. बी. जाधव यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.


अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड येथून १० जून रोजी सुरू होणारा राज्यव्यापी लाँग मार्च १५ जून रोजी अहिल्यानगर शहरात दाखल होणार असून, या लाँग मार्चचे स्वागत करण्यासाठी आणि समाजबांधवांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली.

बैठकीत लाँग मार्चचे नियोजन, स्वागत सोहळ्याची रूपरेषा, जनजागृती अभियान तसेच विविध समित्यांची स्थापना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मार्च शहरात दाखल होताना मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी व्हावेत यासाठी प्रत्येक भागात संपर्क अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ उपस्थिती वाढविण्याऐवजी अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाला विरोध का केला जात आहे, याबाबतही जनतेमध्ये व्यापक जनजागृती केली जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

स्वागत सोहळ्याचे नेतृत्व जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते करणार असून समता सैनिक दलालाही या आंदोलनात सहभागी करून घेण्यात येणार आहे. शहरातील विविध सामाजिक संघटना, युवक आणि महिला यांनाही या लढ्यात सहभागी करून घेण्यावर भर देण्यात आला. बैठकीत बोलताना उपस्थितांनी अनुसूचित जातींमधील बहुतांश समाजघटक उपवर्गीकरणाच्या विरोधात असल्याचा दावा केला. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न होत असून जाती–जातींमध्ये संघर्ष निर्माण करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. मातंग समाजासह सर्व घटकांपर्यंत जाऊन या विषयाची वस्तुस्थिती पोहोचविण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

एन.एम. पवळे म्हणाले की, अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ एका समाजाचा प्रश्न नाही, तर तो संविधानिक हक्क आणि सामाजिक न्यायाशी संबंधित विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या चौकटीत राहून समाजाला एकत्र ठेवण्याचे काम आपण केले पाहिजे. उपवर्गीकरणाच्या नावाखाली समाजात फूट पाडण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. बीड ते मुंबई या राज्यव्यापी लाँग मार्चमध्ये अहिल्यानगर जिल्हा मोठ्या ताकदीने सहभागी होईल. प्रत्येक गावात, प्रत्येक वस्तीत जाऊन जनजागृती करणे ही काळाची गरज असल्याचे ते म्हणाले.

विजय भांबळ म्हणाले की, लाँग मार्च हा सामाजिक न्यायाच्या लढ्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. या स्वागत सोहळ्याचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावी पद्धतीने केले जाईल. समाजातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्व संघटनांनी या आंदोलनात सहभागी व्हावे. हा केवळ स्वागताचा कार्यक्रम नसून संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी एकत्र येण्याचा संदेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


संजय कांबळे यांनी सांगितले की, उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर समाजामध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने लोकांपर्यंत सत्य माहिती पोहोचविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. जनजागृतीशिवाय कोणतीही चळवळ यशस्वी होत नाही. आपण संविधान, समता आणि बंधुतेच्या मूल्यांवर विश्वास ठेवतो. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या जातीय तेढीला बळी न पडता सर्व समाजघटकांना सोबत घेऊन ही लढाई लढावी लागेल. १५ जूनचा लाँग मार्च हा समाजाच्या एकजुटीचे आणि संघर्षशीलतेचे प्रतीक ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यकर्त्यांनी संविधान आणि सामाजिक एकात्मतेच्या रक्षणासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलन मोडून काढण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास पँथरची भूमिका घेण्याचा, इशाराही यावेळी देण्यात आला. उपस्थितांनी ही लढाई सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये आणि समाजातील ऐक्य टिकविण्यासाठी असल्याचे सांगितले. १५ जून रोजी सायंकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेत राज्यभरातील प्रमुख नेते आणि कार्यकर्ते मार्गदर्शन करणार आहेत. तसेच लाँग मार्च सुपाच्या दिशेने रवाना होत असतानाही मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी होणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

बैठकीच्या शेवटी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधानविरोधी असलेल्या जातीय उपवर्गीकरणाला विरोध दर्शविण्यात आला. तसेच समाजातील सर्व घटकांनी एकत्र राहून सामाजिक न्याय आणि संविधानिक हक्कांच्या रक्षणासाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला.

### ७ जूनला जिल्हाभरातील आंबेडकरी कार्यकर्त्यांची निर्णायक बैठक

१५ जून रोजी अहिल्यानगरात येणाऱ्या राज्यव्यापी लाँग मार्चच्या स्वागतासाठी आणि उपवर्गीकरणाविरोधातील जनआंदोलन अधिक व्यापक करण्यासाठी ७ जून रोजी जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत लाँग मार्चच्या स्वागताचे नियोजन, जनजागृती मोहीम, विविध समित्यांची स्थापना आणि जिल्ह्यातील सहभाग वाढविण्याबाबत निर्णय घेतले जाणार आहेत. जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. विलास साठे यांनी केले आहे.



**राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट**

पुण्यातील सर्किट हाऊस येथे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची जगभरातील १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालीका व प्रेरक वक्ता ब्रह्माकुमारी त्रिवेणी दीदी व १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके यांनी पुण्यात भेट घेऊन संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व त्यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली. यावेळी बी के आशा दीदी उपस्थित होत्या.

# डोळसे नॅचरल ऑईल्सच्या 'लाईव्ह ऑईल शॉप'चे उद्घाटन

नगर – सावेडी परिसरातील धर्माधिकारी मळा येथे डोळसे नॅचरल ऑईल्सच्या 'लाईव्ह ऑईल शॉप'चा उद्घाटन समारंभ आमदार संग्राम जगताप यांच्याहस्ते झाला. कोल्ड प्रेस घाण्यावर पारंपरिक पद्धतीने तयार करण्यात येणाऱ्या विविध खाद्यतेलांच्या विक्रीसाठी सुरू करण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे, नगरसेविका वंदना ताठे, माजी नगरसेवक दगडुमामा पवार, भेय्या पवार उपस्थित होते. उद्घाटनानंतर उपस्थितांनी लाईव्ह ऑईल मशीनची पाहणी करत तेल निर्मिती प्रक्रियेची माहिती घेतली. करडई तेल, शेंगदाणा तेल, सूर्यफूल तेल, तीळ तेल, मोहरी तेल, जवस तेल, खोबरेल तेल आणि बदाम तेल आदी विविध प्रकारची तेल उत्पादने येथे थेट ग्राहकांसमोर तयार करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

संचालक लक्ष्मणराव डोळसे यांनी सांगितले की, ग्राहकांना शुद्ध आणि नैसर्गिक तेल मिळावे, या उद्देशाने आम्ही हा उपक्रम सुरू केला आहे. कोल्ड प्रेस पद्धतीमुळे तेलातील पोषक घटक टिकून राहतात आणि आरोग्यासाठी फायदेशीर तेल ग्राहकांना मिळते. ग्राहकांचा विश्वास आणि समाधान हेच आमचे सर्वात मोठे बळ असून गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. त्यांनी उपस्थितांचे आणि ग्राहकांचे आभारही मानले.

समारंभास लक्ष्मणराव डोळसे, अर्जुन डोळसे, दिपाली डोळसे, सूर्यकांत ससाने, प्रसाद शिंदे, निलेश गिरमे, मंथन चव्हाण, धनंजय भोज, कृष्णा डोळसे, अशोक डोळसे, विशाल धोत्रे आदींसह नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक अर्जुन डोळसे यांनी केले तर स्वागत दीपाली डोळसे यांनी केले.


डोळसे नॅचरल ऑईल्सच्या 'लाईव्ह ऑईल शॉप'चा उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

# समाजसेवा आणि अध्यात्म यांचा संगम घडविणाऱ्या उपक्रमांना सर्वांनी पाठबळ द्यावे

**आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; अधिक मासानिमित्त नऊकुंडी श्री विष्णू याग, कीर्तन सोहळा व नेत्रचिकित्सा शिबिराला प्रतिसाद**

नगर – समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अध्यात्म आणि समाजसेवा या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. धार्मिक कार्यक्रमातून संस्कारांची जपणूक होते, तर आरोग्यविषयक शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळतो, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री अमळनेरकर महाराज सेवा समितीने धार्मिक परंपरा जपत समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी समितीचे अभिनंदन केले. अशा उपक्रमांमुळे समाजात एकोपा, सेवाभाव आणि सकारात्मक विचारांची वृद्धी होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांची आजच्या काळातील गरज अधोरेखित केली.

श्री अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या नऊकुंडी श्री विष्णू याग, कीर्तन सोहळा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचा शुभारंभ बंधन लॉन्स येथे भक्तिमय वातावरणात झाला. ह.भ.प. प्रसाद महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यास भाविकांचा प्रतिसाद लाभला. अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून पहिल्याच दिवशी नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला.


श्री अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या नऊकुंडी श्री विष्णू याग, कीर्तन सोहळा आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचा शुभारंभ बंधन लॉन्स येथे भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी ह.भ.प. प्रसाद महाराज, आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यास भाविकांचा प्रतिसाद लाभला.

याच निमित्ताने नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रफुल्ल चौधरी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रचिकित्सा शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, डॉ. प्रफुल्ल चौधरी, नगरसेवक महेश लोंढे, सेवा समितीचे पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच नागरिक उपस्थित होते.

या नेत्रचिकित्सा शिबिरात सुमारे दोनशेहून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवत नेत्रतपासणी करून घेतली. ग्रामीण व शहरी भागातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांनी या शिबिराचा लाभ घेतला. तपासणीदरम्यान आवश्यक रुग्णांना पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्यसेवेचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश ठेवून आयोजित केलेल्या या शिबिराचे उपस्थितांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वैदिक मंत्रोच्चारांच्या वातावरणात नऊकुंडी श्री विष्णू यागाला प्रारंभ करण्यात आला. यागस्थळी भाविकांनी श्रद्धेने उपस्थित राहून धार्मिक विधींमध्ये सहभाग घेतला. अधिक मास हा अध्यात्म, साधना आणि दानधर्मासाठी महत्त्वाचा मानला जात असल्याने या काळात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

पहिल्या दिवशी ह.भ.प. प्रसाद महाराज यांची तुला आणि वायनदानाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या वेळी भाविकांनी सहभाग घेतला. धार्मिक परंपरा जपत समाजहिताचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. तुला सोहळ्यादरम्यान भक्तांनी जयघोष करीत संतांविषयीची श्रद्धा व्यक्त केली. त्यानंतर ह.भ.प. महेश जोशी महाराज यांच्या प्रवचनाने उपस्थितांना आध्यात्मिक मार्गदर्शन मिळाले. त्यांनी अधिक मासाचे धार्मिक महत्त्व, संत साहित्याची परंपरा, नामस्मरणाचे महात्म्य आणि समाजजीवनात संस्कारांचे स्थान यावर सखोल विवेचन केले. त्यांच्या ओजस्वी आणि अभ्यासपूर्ण निरूपणामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. प्रवचनातून नैतिक मूल्ये जपण्याचा आणि समाजात सकारात्मक विचार रुजविण्याचा संदेश देण्यात आला.


यावेळी देवगड संस्थानचे महंत प्रकाश नंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते संतपूजनाचा कार्यक्रम झाला. संत परंपरेचे स्मरण करून समाजात सद्भावना, सेवा आणि अध्यात्मिक विचारांचा प्रसार व्हावा, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. संतांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी समाजाची असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात विविध संत–महंत आणि धर्मप्रेमी नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सामूहिक हरिपाठाचे आयोजन करण्यात आले. शेकडो भाविकांनी एकत्र येऊन हरिनामाचा गजर करत भक्तीमय वातावरण निर्माण केले. हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यानंतर रात्री ह.भ.प. ऋषिकेश महाराज खोसे यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविकांना भक्तिरसाचा आनंद दिला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांची आजच्या काळातील गरज अधोरेखित केली. ते म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अध्यात्म आणि समाजसेवा या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. धार्मिक कार्यक्रमातून संस्कारांची जपणूक होते, तर आरोग्यविषयक शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळतो. श्री अमळनेरकर महाराज सेवा समितीने धार्मिक परंपरा जपत समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी समितीचे अभिनंदन केले. अशा उपक्रमांमुळे समाजात एकोपा, सेवाभाव आणि सकारात्मक विचारांची वृद्धी होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सेवा समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. आगामी दिवसांतही प्रवचने, कीर्तने, धार्मिक विधी आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अध्यात्म, संस्कार, आरोग्य आणि समाजहित यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे अधिक मासातील धार्मिक वातावरणाला विशेष उंची प्राप्त झाली.

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महिला जिल्हाध्यक्षपदी लतिका पवार यांची फेरनियुक्ती



नगर – निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (महाराष्ट्र राज्य) यांच्या महिला जिल्हाध्यक्षपदी लतिका नंदकुमार पवार यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे यांनी त्यांच्या पर्यावरण विषयक जनजागृती, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत ही नियुक्ती जाहीर केली.

सन २०२३ ते २०२५ या कालावधीत त्यांनी केलेल्या प्रभावी कार्याचा गौरव म्हणून त्यांच्यावर पुन्हा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. त्यांचा नवीन कार्यकाळ २०२६ ते २०२९ या तीन वर्षांसाठी असणार असून, या काळात पर्यावरण संवर्धनासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि सामाजिक सहभाग वाढविणाऱ्या योजना राबविण्याचा त्यांचा मानस आहे. लतिका पवार यांनी पर्यावरण संरक्षणासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेली झाडे जगविणे आणि त्यांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे असल्याचे सांगितले. आगामी काळात शालेय विद्यार्थी, महिला बचत गट, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक वृक्षसंवर्धन मोहीम उभारली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर प्लास्टिकमुक्ती, जलसंवर्धन, जैवविविधता संरक्षण, स्वच्छता अभियान आणि पर्यावरणपूरक जीवनशैली याबाबत जनजागृती करण्यावरही भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लतिका पवार या पर्यावरण क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रातही सक्रियपणे कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक संस्था ऑल इंडिया लिनेस क्लबमध्ये त्यांनी प्रेसिडेंट ते डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंटपर्यंत विविध महत्त्वपूर्ण पदांची जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय मागील २० वर्षांपासून त्या मराठा समाजामध्ये विनामूल्य विवाह जुळविण्याचे कार्य करत आहेत.

## ज्ञानसंपदा शाळेत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण, एआय फॉर टीचर्स कार्यशाळा उत्साहात


डॉ. सुनिता भागवत

नगर – २ जून रोजी ज्ञानसंपदा शाळेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करून अध्यापन प्रक्रिया अद्ययावत करण्याच्या हेतूने शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शिका म्हणून डॉ. सुनिता भागवत यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. डॉक्टर सुनिता भागवत या शिक्षणतज्ञ असून ए.आय सर्टीफाईड ट्रेनर आहेत. सध्या त्या अनेक शाळांमधून (AI) फॉर टीचर्स' यासंदर्भात शिक्षकांसाठी कार्यशाळा घेत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) नुसार ज्ञानसंपदा शाळा मागील वर्षापासून याची अंमलबजावणी करत आहे, यात सूत्रबद्धता येण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून विशिष्ट क्रमाने कृती सादर केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच (AI) च्या सहाय्याने अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक परिणामकारक व विद्यार्थी केंद्रित कसे बनवता येईल त्या संदर्भात विशिष्ट क्लुप्त्या डॉ.भागवत यांनी शिक्षकांना उलगडून दाखवल्या. त्यांनी (AI) चा सुयोग्य वापर करत असताना त्याची परिणामकारकता, त्यातील नावीन्यता लक्षात घेऊन पाठ नियोजन तयार करण्यासाठी विशिष्ट व ठळक टेम्पलेटनुसार शिक्षकांना प्रशिक्षण दिले. पाठ नियोजन करताना योग्य प्रॉम्प्ट कसे वापरायचे याचे तंत्र उलगडून सांगितले. योग्य प्रमाणात त्याचा वापर करून नवीन शैक्षणिक धोरणानुसार म्हणजे (NEP) व तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापरामुळे शिक्षकांना अधिक सक्षम बनवण्यासाठी तसेच शिक्षणाच्या प्रवाहाला अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी हा अत्यंत उपयुक्त ठरू शकतो, असे प्रतिपादन केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर किती प्रमाणात व कशा स्वरूपात करावा याबाबत साक्षरता असायला हवी, विचाराला चालना देणे विचारांचा प्रवास सतत प्रवाहित व्हायला हवा, कृतीयुक्त शिक्षणामधून, प्रत्यक्ष अनुभवातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमातून अध्ययन –अध्यापन प्रक्रियेचा दर्जा (AI) च्या माध्यमातून वाढवायला हवा, याविषयी जागरूकता निर्माण करत त्यात सूत्रबद्धता कशी निर्माण व्हायला हवी या बद्दल मार्गदर्शन केले.

पाठ नियोजन, विविध उपक्रम (AI) च्या माध्यमातून बनवताना तो विद्यार्थी केंद्रित, विद्यार्थी निरीक्षण, स्तर, वयोमर्यादा लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे (AI) आपल्या ज्ञानाचा, माहितीचा सहकारी आहे, पर्याय नव्हे, तो आपल्याला मार्ग दाखवणारा आहे, रस्त्याने आपल्याला चालायचे आहे हे या कार्यशाळेत डॉ. भागवत यांनी अधोरेखित केले. तसेच ए.आय वापरताना कोणती काळजी घ्यावी व कोणती जबाबदारी स्वीकारावी हे ज्ञात असणे अत्यंत गरजेचे आहे. ए.आय मुळे विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य, निर्णयक्षमता, कल्पनाशक्ती वृद्धिंगत होऊन शिक्षणातील अडथळे दूर करण्यास सहकार्य करेन, तसेच व्यवस्थापन सुसह्य करण्यासाठी त्याचा सुयोग्य उपयोग कसा करून घ्यावा त्याबद्दलचे तंत्र शिकवले. पुष्कळ वेळेला अभ्यासक्रमातल्या अनेक संकल्पना ह्या शिक्षकांना स्वतःलाच नीट कळलेला नसतात किंवा त्या सोप्या करून विद्यार्थ्यांना कशा सांगाव्यात हे समजत नसते. अशा वेळेला ख चा वापर कसा करावा याच्यावर पण त्यांनी भर दिला याचाच अर्थ स्वतःच्या शिक्षणासाठी आपला विषय पक्का करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी (AI) चा कसा वापर होऊ शकतो हे या कार्यशाळेतून उलगडले. त्याचप्रमाणे वर्गातील मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी नक्की काय करावे. त्यासाठी (AI) कसे मदत करू शकेल त्या विद्यार्थ्यांच्या आकलनशक्ती प्रमाणे कुठल्या प्रकारचा आशय, कुठल्या प्रकारच्या परीक्षा, त्यांच्यासाठी घेता येतील व त्यासाठी (AI) कशी मदत करू शकेल, या विषयावर पण प्रकाश टाकला.

डॉ.भागवत यांनी घेतलेल्या कार्यशाळेत शिक्षकांचा आत्मविश्वास वाढला, त्यांच्या शंकांचे सुयोग्य निरसन झाले, योग्य, अयोग्य गोष्टीचा वापर याबद्दल माहिती मिळाली. डिजिटल कौशल्य विकसित झाले. अध्यापन परिणामकारक होण्यासाठी कल्पकतेला चालना मिळाली. कृतीयुक्त शिक्षणात मूल्यमापन प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यशाळेचा शिक्षकांना, विद्यार्थी हितासाठी नक्कीच उपयोग होईल.

# धम्माल मनोरंजन

### सुविचार



छोटया पक्षाचे पंख घेऊन तुम्ही गरुडासारखे उड्डाण करू शकणार नाही.

## दिनविशेष ०५ जून

१७२३: स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता ॲडॅम स्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: १७ जुलै १७९०)

१८७९: भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक नारायण मल्हार जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ३० मे १९५५)

१८८१: हार्मोनियम वादक, अभिनेते व संगीतकार, नाट्यसंगीताचे पहिले शिल्पकार, पहिल्या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक, संगीत क्षेत्रातील पहिले सौंदर्य मीमांसक, संगीतिकांचे प्रवर्तक गोविंदराव टेंबे यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १९५५)

१८८३: ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मायनार्ड केन्स यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९४६)

१९०८: कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया चे सहसंस्थापक रवि नारायण रेड्डी यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९१)

१९४६: विल्यम्स एफ टीम चे सहसंस्थापक पॅट्रिक हेड यांचा जन्म.

१९६१: भारतीय टेनिस खेळाडू आणि प्रशिक्षक रमेश कृष्णन यांचा जन्म.

१९७२: भारतीय पुजारी आणि राजकारणी योगी आदित्यनाथ यांचा जन्म.

१९६१: भारतीय लेखक आणि राजकारणी, ओडिशाचे आमदार बिष्णू सेठी यांचा जन्म (मृत्यू : १९ सप्टेंबर २०२२)

१९१५: इंग्लिश बॅरिस्टर आणि बायोकेमिस्ट, मेन्सा कंपनीचे सह–संस्थापक लान्सलॉट वेअर यांचा जन्म (मृत्यू : १५ ऑगस्ट २०००)

१९३५: न्यूझीलंड संसदेवर निवडून आलेल्या पहिल्या महिला एलिझाबेथ मॅककॉम्ब्स यांचे निधन (जन्म: १९ नोव्हेंबर १८७३)

५ जून मृत्यू

१९५०: कुस्तीगीर व प्रशिक्षक हरिश्चंद्र बिराजदार यांचे निधन. (जन्म: १४ सप्टेंबर २०११)

१९७३: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर तथा श्री गुरूजी यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९०६)


१९९६: भारतीय कवि आणि विद्वान आचार्य कुबेर नाथ राय यांचे निधन. (जन्म: २६ मार्च १९३३)

१९९९: राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे शाहूमहाराज भोसले यांचे निधन.

**जगाच्या कल्याणा संताची विभूती, देह कष्टविती उपकारे–आप्पा पटवर्धन.**

ढग समुद्राचं खारट पाणी पितो, पण वृष्टी मात्र गोड पाण्याची करतो. त्याप्रमाणे सज्जन दुसऱ्याचे अप्रिय शब्द ऐकूनही स्वत: मात्र चांगले बोलतो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांना समाजाकडून त्रास झाला, परुतु त्यांनी कधीच दु:ख व्यक्त केले नाही. उलट अनुभवाच्या भट्टीतून त्यांना परिपक्वताच आली. संतांचे अवतारकार्य जगाच्या कल्याणासाठीच असल्याचे आजवर दिसून आले आहे. परमेश्वराकडे मागणी करताना मात्र त्यांनी सर्व विश्वाचे कल्याणच मागितले.

## महाशब्दकोडे



### आडवे संकेत

१) थोडक्यात समाधान मानणारा
३) आज्ञा पाळणारा
८) फारशी भाषेनुसार तरुण
९) शस्त्राचा घाव
१०) आड करणे, बाजूला करणे, दिसू न देणे
११) मला
१२) गाय
१३) पक्के बस्तान
१५) औषधी
१८) दशा, स्थिती
१९) काम आहे तोवर हांजी हांजी व काम संपले की तीळमात्र भाव न देणे
२०) आवश्यकता
२१) क्षमा, माफी
२३) सार्वजनिक
२४) लाकडाची एक जात
२६) धमणी, तपकीर
२८) कमी बुद्धिचा
३०) नेहमी
३२) पोवाडा
३५) आपल्या देशातील
३७) विसरलेला मजकूर पत्राच्या शेवटी लिहितात तो
३९) ज्ञान, माहिती
४०) वाद्य वाजविणारा
४२) सैन्यात नुकताच भरती झालेला
४५) मारा
४७) एक संख्या
४८) जास्त भाजल्या जाणे
४९) ऋतुमती स्त्री

### उभे संकेत

१) बत्तीसावा किंवा शेवटच्या उगवणारा दात
२) मृत आत्म्यांना जीवंत करणारी विद्या
३) ध्वनी
४) माहिती
५) जाड कणिक
६) नख
७) तरी देवा मला पावशील काय.
८) जुळवाजुळव
१४) कृष्ठरोग
१५) प्रत्येक, हर
१६) पाण्याचे तळे
१७) दारु पिणे १९) हत्ती
२०) गंमत करणारा
२२) नाना पाटेकर व मधूचा क चित्रपट.
२३) सार्वजनिक सभा
२५) कडधान्याचे तुकडे
२७) एक तंतुवाद्य २९) चर्चा
३१) वडीलाचे वडील, आजा
३३) माझा
३४) पुर्वीच्या काळातील एक गायिका
३६) आई व वडील यांच्याकरीता पत्रात लिहिण्याचा मायना
३८) बिछाईत
४०) सुताराजवळील एक शास्त्र
४१) एक तेल बी
४२) गरीब, दीन
४३) फणसाचा गाभा
४४) दोन वेळा ट
४६) र ला चा अक्षरपालट

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | धु | प्र | वे | श | | वा | म | कु | क्षी | | न | स |
| न | म्र | ता | | त | वा | रि | ख | | | | ग | र |
| च | पा | प | णे | | क | रा | र | म | दा | र | | प |
| रा | न | | | आ | ळ | शी | | स | दा | च | र | ण |
| ई | | स | | र्ज | | | आ | | गि | | च | |
| | | मा | न | व | ता | | बा | स | री | | ना | ग |
| | ग | प | | | | क | ल | मी | | रु | | धा |
| स | र्व | त्र | | वा | | | वृ | क्षा | रो | प | ण | |
| मा | ह | | | सु | सं | ब | द्ध | | ज | रा | | |
| धी | र | | आ | दे | श | | | स | दा | व | र्त | |
| | ण | | | व | य | स्क | र | | र | | | प |
| पु | | दो | सा | | | र्ट | | सी | | म | रा | ठा |
| ढे | क | र | | पा | ली | | ज | मा | दि | ला | ख | र |




१) पुढीलपैकी कोणते विधेयक मांडण्यासाठी राष्ट्रपतींची परवानगी घ्यावी लागते? अ)वृत्तपत्र विधेयक ब)स्थगन प्रस्ताव क)अविश्वास ठराव ड)धन विधेयक
२) कोणत्या झाडाच्या चिकट पदार्थापासून साबुदाणा तयार करतात? अ)रबर ब)रिठा क)कोकोट्रस ड)बेझ्की
३) झाडाची पाने का पिवळी पडतात? अ)नायट्रोजनमुळे ब)क्लोरीनमुळे क)बेरीअम ड)थोरीअम
४) लहान मुलांना सोयाबिनचे दुध पाजल्यास कोणता रोग होतो? अ)जॉयंडीस ब)गॉयटर क)पोलिओ ड)मलेरिया
५) हरितक्रांती खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या पिकाशी निगडीत आहे? अ)दुध उत्पादन ब)ऊस उत्पादन क)अन्नधान्य उत्पादन ड)तंतू उत्पादन
६) पचनासाठी अन्न बारीक केले जाते व त्यात निरनिराळे पाचकरस मिसळले जाऊन ते पचन मार्गातून पुढे पुढे नेले जाते हा प्रकार कोणता? अ)जैविक पचन ब)कायिक पचन क)जैवरासायनिक पचन ड)बाह्य पचन
७) कोणता एक अन्नघटक सर्वात जास्त ऊर्जा पुरवितो? अ)साखर ब)जीवनसत्वे क)स्निग्ध पदार्थ ड)प्रथिने
८) महाराष्ट्राची स्थापना केव्हा झाली? अ)१ मे १९६० ब)५ मे १९६२ क)१ मे १९६३ड)१ जून १९६०
९) ऊस व कापूस या पिकासाठी सर्वात चांगली मृदा कोणती? अ)चिक्न ब)काळी क)तांबडी ड)गाळाची
१०) महाराष्ट्राला खालीलपैकी कोणत्या वाऱ्यापासून पाऊस मिळतो? अ)वायव्य मोसमी वारे ब)नैऋत्य मोसमी वारे क)आग्नेय मोसमी वारे ड) ईशान्य मोसमी वारे
११) महाराष्ट्रास सर्वाधिक लांबीचा राष्ट्रीय महामार्ग कोणता? अ)धुळे– नागपूर ब)मुंबई– अहमदाबाद क)मुंबई– बंगलोर ड)मुंबई– आग्रा
१२) महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय विमानतळ कोठे आहे? अ)मुंबई ब)अकोला क)पुणे ड)नागपूर
१३) पर्जन्यमानाच्या दृष्टीने पुणे व नगर जिल्ह्यांना काय म्हणतात? अ)पर्जन्यछायेचा प्रदेश ब)मध्यम पावसाचा प्रदेश क)जास्त पावसाचा प्रदेश ड)कमी पावसाचा प्रदेश
१४) महाराष्ट्रातील सर्वाधिक उंचीचे शिखर कोणते? अ)महाबळेश्वर ब)कळसूबाई क)हरिश्चंद्र डोंगर ड)साल्हेर
१५) क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा कोणता? अ)अमरावती ब)नागपूर क)नगर ड)अकोला
१६) रेगूर कशास म्हणतात? अ)लाल माती ब)गाळाची माती क)काळी माती ड) मुरमी माती
१७) क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात लहान जिल्हा कोणता? अ)मुंबई उपनगर ब)हिंगोली क)वाशिम ड)उस्मानाबाद
१८) खालीलपैकी महाराष्ट्र दिन कोणता? अ)६ मे ब)१ एप्रिल क)१ मे ड)१ जाने.
१९) विभागीय आयुक्त हा जिल्हा नियोजन मंडळाचा कोण असतो? अ)सभासद ब)उपाध्यक्ष क)अध्यक्ष ड) सचिव
२०) जालना जिल्ह्याची निर्मीती कोणत्या जिल्ह्यातून करण्यात आली? अ)बीड ब)औरंगाबाद क)बुलडाणा ड) जळगाव

**उत्तर: (१–ड), (२–क), (३–अ), (४–ब), (५–क), (६–ब), (७–क), (८–अ), (९–ब), (१०–ब), (११–अ), (१२–अ), (१३–अ), (१४–ब), (१५–क), (१६–क), (१७–अ), (१८–क), (१९–ब), (२०–ब).**

### विनोद




'पाहा बरं दिनू सध्या शाळेत काय शिकतोय। त्याची चाचणी घेत राहा. शाळेत काय शिकवल जात कळत नाही. एवढी मोठी फी सुद्धा भरावी लागते।' नवरा बायकोला म्हणाला.
थोड्या वेळाने नवऱ्याने चाचणीसाठी प्रश्न विचारला, 'बेटा, जर मी तुला तीन अंडी सकाळी दोन अंडी संध्याकाळी दिली तर एकूण किती अंडी होतील?'
दिनू गप्पच बसला.
वडील: सांगना।'
दिनू: 'बाबा, तुमचा प्रश्नच चुकीचा आहे. तुम्ही अंडी देऊ शकत नाही. अंडी तर कोंबडी देते.।'

### म्हणी व अर्थ

**एका म्यानात दोन तलवारी राहत नाहीत.**
अर्थ: दुसऱ्याच्या अडचणीचा विचार न करता, स्वत:चा फायदा पाहणे.
**एकमेकांसहाय्य करु, अवधे धरू सुपंथ.**
अर्थ: एकमेकांच्या सहकार्याने सर्वांचाच फायदा होत असतो.
**एक घाव दोन तुकडे.**
अर्थ: एका झटक्यात वादग्रस्त गोष्टीचा निकाल.
**एक पाय तळ्यात नि एक पाय मळ्यात.**
अर्थ: दोन्ही गोष्टीवर अवलंबून राहणारा.
**एकटा जीव सदाशिव.**
अर्थ: एकट्या माणसाला कशाचीच चिंता नसते, तो चैनीत दिवस घालवितो.

## फिल्मी शब्दकोडे





### आडवे संकेत

१) सन २००० मध्ये आलेला सलमान खान, प्रिती झिंटा आणि रानी मुखर्जीचा चित्रपट.
६) सन १९८२ मध्ये उमेश मेहरा दिग्दर्शीत या चित्रपटात कवलजीत आणि जिनत अमान होते.
७) सन १९७२ मध्ये आलेल्या जित चित्रपटाची नायीका.
१०) सन १९९६ मध्ये भरत रंगाचारी दिग्दर्शीत अक्षयकुमार आणि अश्विनी भावेचा चित्रपट.
१२) जिंदगी एक (चित्रपट)
१४) सन १९८० मध्ये सुभाष घई दिग्दर्शीत ऋषी कपूर आणि टिना मुनीमचा चित्रपट.
१५) सिला (चित्रपट)
१७) सन १९९० मध्ये राकेश सेठी दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ आणि सोनम होते.
१९) गोविंदा आणि सोनमचा चित्रपट.
२०) दाग दि फायर चित्रपटाचे दिग्दर्शक.
२१) मेरे भुलना जाना तु अपना कर्ज निभाना.....
२२) प्यार झुकता (चित्रपट)
२४) पती (चित्रपट)
२५) सन १९९७ मध्ये आलेला गोविंदा, करिश्मा कपूरचा चित्रपट.
२७) हृत्विक रोशन आणि करिश्मा कपूरचा एक चित्रपट.
२८) संजय कपूर, सलमान खान आणि शिल्पा शेट्टीचा चित्रपट.
२९) संजय दत्त व नंदिता दासचा चित्रपट.
३०) दुनिया में कितना गम है मेरा नाम कितना... या गाण्याचा चित्रपट.
३१) सुनील शेट्टी, सुष्मीता सेन व नम्रताचा चित्रपट.
३२) मिथून चक्रवर्ती आणि पुजा भट्टचा चित्रपट.
३३) धर्मेंद्र आणि रेखाचा चित्रपट.
३४) आफताब आणि युक्ता मुक्तीचा चित्रपट.
३५) सलमान खान, करिश्मा आणि रंभाचा चित्रपट.

### उभे संकेत

१) अजय देवगण, ऐश्वर्या रॉय आणि अमिताभ बच्चन, संजय दत्तचा चित्रपट.
२) सन १९९५ मध्ये बी. कृष्णराव दिग्दर्शीत ऋषीकेश आणि ममता कुलकर्णीचा चित्रपट.
३) सन १९९२ मध्ये मंसुर खान दिग्दर्शीत आमिर खान, आयेशा झुल्काचा चित्रपट.
४) दिल दिया है जान भी देंगे ऐ वतन तेरे लिए.... या गाण्याचा चित्रपट.
५) सन १९९४ मध्ये संजय गुप्ता दिग्दर्शीत संजय दत्त, रविना टंडन, आदित्य पांचोली आणि अतुल अग्निहोत्रीचा चित्रपट.
६) नबी (चित्रपट)
८) ताज (चित्रपट)
९) सन १९८९ मध्ये गुलजार दिग्दर्शीत या चित्रपटात विनोद खन्ना आणि हेमामालिनी होते.
११) सन १९९१ मध्ये शशी कपूर दिग्दर्शीत अमिताभ बच्चन, डिम्पल कपाडिया यांचा चित्रपट.
१३) चिरंजीवी, मिनाक्षी शेषांद्री आणि राज बब्बरचा चित्रपट.
१६) सन १९८९ मध्ये बि. सुभाष दिग्दर्शीत या चित्रपटात आमिर खान आणि जुही चावला होते.
१८) सन १९७८ मध्ये देवेंद्र गोयल दिग्दर्शीत शशी कपूर आणि रेखाचा चित्रपट.
२३) सुभाष घई दिग्दर्शीत जैकी श्रॉफ, मिनाक्षी शेषांद्रीचा चित्रपट.
२६) सन २००२ मध्ये आलेल्या लाल सलाम चित्रपटाची नायीका.
२८) सन १९८६ मध्ये बी.आर. इशारा दिग्दर्शीत शशी कपूर आणि जिनत अमानचा चित्रपट.
३१) सन १९६५ मध्ये रामानंद सागर दिग्दर्शीत राजेंद्रकुमार आणि साधनाचा चित्रपट.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गो | विं | दा | | मु | कु | ल | दे | व | | ब | ब्ब | र |
| विं | | दा | | | | | | | | डे | | ह |
| द | | मु | झे | कु | छ | क | ह | ना | है | | र | मा |
| नि | | नी | | छ | | ह | | | रा | | जा | न |
| ह | त्या | | | कु | मा | र | | स | न | म | | |
| ला | | | कु | छ | | | जॉ | नी | | | | श |
| नी | ल | म | | | | दि | न | | दि | व्य | श | क्ती |
| | | ही | | | | ल | | | ल | | र्मि | |
| स | ल | मा | | जि | ते | है | शा | न | से | | ता | ल |
| मी | | चौ | | तें | | बे | | | | | है | |
| र | | ध | मैं | द्र | | ता | क | त | | | गो | ल |
| | ते | री | | | क | ब | | ला | | जो | र | |
| रा | जा | | का | जो | ल | | का | श | | श | | |

### चारोळी

तुझ्या–माझ्या लग्नाला
जरी झाली वर्षे वीस
अजुनही भेटीसाठी
जीवं होतो कासावीस.

### पाक कला



**मोड असलेल्या कडधान्याचे सॅलड**

साहित्य: मोड आलेले हिरवे संबंध मूग १ वाटी, मेथ्या (दाणे), मोट मोड आलेले १ वाटी, कोथिंबीर बारीक चिरलेली, लिंबाचा रस, मीठ, तिखट.

कृती: प्रथम कडधान्ये मोड आणून घ्यावीत (कच्ची) नंतर सर्व एका बाऊलमध्ये `वून कोथिंबीर, तिखट, मीठ, लिबूरस, साखर एकत्र मिसळावी, हे कडधान्याचे मोड आलेले सॅलड चवदार लागते व मधुमेही रूग्णासाठी पौष्टिक असते. यात सर्व जीवनसत्व असते.

# ‘आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीत’ ‘हायजीन सिटी’ माहिती फलकांचे वितरण

### स्वच्छ अन्न, निरोगी नागरिक घडविण्यासाठी संस्थेचा उपक्रम; हायजीन सिटीच्या माध्यमातून चवीसोबत आरोग्याचीही हमी : माजी नगरसेविका शितलताई जगताप

नगर – नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत तसेच खाद्य व्यवसायिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने हायजीन फर्स्ट संस्थेच्या वतीने बुरुडगाव रोड येथील आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांना ‘हायजीन सिटी’ माहिती फलकांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून खाद्यपदार्थ व्यवसायिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत ग्राहकांमध्येही आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यात आली.


बुरुडगाव रोड येथील आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीवरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांना ‘हायजीन सिटी’ माहिती फलकांचे माजी नगरसेविका शितलताई जगताप यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

यावेळी माजी नगरसेविका शितलताई जगताप यांच्या हस्ते माहिती फलकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास हायजीन फर्स्ट संस्थेच्या संस्थापिका वैशाली गांधी, नगरसेवक प्रकाश भागानगरे, वैशाली मनोत तसेच खाद्य व्यवसायिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना शितलताई जगताप म्हणाल्या की, हायजीन फर्स्ट संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेला ‘हायजीन सिटी’ उपक्रम शहराच्या आरोग्यदायी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. खाद्यपदार्थ विक्रेत्यांना स्वच्छतेचे धडे देऊन ग्राहकांच्या आरोग्याची जबाबदारी पार पाडण्याचा हा स्तुत्य प्रयत्न आहे. नागरिक जे अन्न खातात ते स्वच्छ, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण असणे गरजेचे आहे. स्वच्छतेच्या माध्यमातूनच निरोगी समाजाची निर्मिती होऊ शकते. त्या पुढे म्हणाल्या की, हायजीन सिटीच्या माध्यमातून केवळ चवीचा विचार न करता आरोग्यालाही प्राधान्य दिले जात आहे. वैशाली गांधी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील हॉटेल्स, चौपाट्या आणि खाद्य स्टॉल्सवर जाऊन स्वच्छतेबाबत सातत्याने जनजागृती केली. त्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम आता दिसून येत असून अनेक खाद्य व्यवसायिक स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळताना दिसत आहेत. आमदार जगताप यांनी शहरात स्वच्छता अभियान राबवून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले, तर वैशाली गांधी यांनी नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित स्वच्छतेच्या सवयी रुजविण्याचे काम केले आहे.

वैशाली गांधी म्हणाल्या की, हायजीन फर्स्ट हा उपक्रम गेल्या दहा वर्षांपासून अहिल्यानगर शहरात राबविला जात आहे. सुरुवातीच्या काळात खाद्य व्यवसायिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र सातत्य, चिकाटी आणि जनजागृतीच्या माध्यमातून आज परिस्थिती बदलली आहे. अनेक खाद्य विक्रेते स्वच्छतेचे नियम पाळत असून ग्राहकांच्या आरोग्याला प्राधान्य देत आहेत. त्या म्हणाल्या की, अन्नपदार्थ तयार करताना स्वच्छता राखणे ही काळाची गरज आहे. दूषित पाणी, अस्वच्छ भांडी आणि अयोग्य साठवण यामुळे अनेक आजार उद्भवतात. हायजीनचे नियम पाळण्यासाठी मोठा खर्च लागत नाही, तर फक्त सवयींमध्ये बदल करण्याची गरज असते. ग्राहकांनीही केवळ पदार्थाची चव पाहू नये, तर त्या ठिकाणची स्वच्छताही तपासावी. स्वच्छतेची संस्कृती निर्माण झाली तर नागरिकांचे आरोग्य आपोआप सुधारेल.

शहरात राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी आमदार संग्राम जगताप यांचे सहकार्य लाभले असून नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी पुढाकार घेऊन आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटी येथे ‘हायजीन सिटी’ उपक्रम प्रभावीपणे राबविला आहे. शहरातील इतर हॉटेल व्यवसायिक, फास्ट फूड स्टॉल चालक आणि चौपाटी व्यावसायिकांनीही या उपक्रमाचे अनुकरण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रकाश भागानगरे म्हणाले की, वैशाली गांधी यांनी हायजीन फर्स्ट संस्थेच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित अन्न मिळावे यासाठी सुरू केलेला ‘हायजीन सिटी’ उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे. या मोहिमेला आता शहरातील खाद्य व्यवसायिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आनंदधाम मनोरंजन नगरी चौपाटीतील सर्व खाद्य व्यवसायिकांनी ‘हायजीन सिटी’ माहिती फलक लावून स्वच्छतेबाबत आपली बांधिलकी दाखवून दिली आहे.

या फलकांमुळे ग्राहकांनाही स्वच्छ अन्नपदार्थ, सुरक्षित खाद्यपद्धती आणि आरोग्यदायी सवयींबाबत माहिती मिळणार आहे. स्वच्छता आणि आरोग्य यांचा थेट संबंध असून या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ‘बालरंगभूमी क्रिकेट लीग’चा ६ व ७ जूनला रंगणार थरार; ऐरोलीत राज्यस्तरीय सामने

नगर – क्रिकेट हा केवळ खेळ नसून तो संघभावना आणि समन्वय वाढविणारा एक उत्तम माध्यम आहे. लहान बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि बालरंगभूमीच्या चळवळीला गती देण्यासाठी सातत्याने कार्यरत असणाऱ्या बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांमध्ये संघटनकौशल्य वाढावे, तसेच त्यांच्या शारीरिक आरोग्याला चालना मिळावी, या उद्देशाने एका अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के–सामंत यांच्या संकल्पनेतून ’बालरंगभूमी क्रिकेट लीग’ चा थरार रंगणार आहे.

६ व ७ जून असे दोन दिवस ऐरोली (नवी मुंबई) येथील युरो इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर ही क्रिकेट लीग खेळवली जाणार आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून रत्नागिरी, जळगाव, पुणे, नंदुरबार, लातूर, परभणी, सांगली, इचलकरंजी, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, धुळे, ठाणे, कल्याण आणि अहिल्यानगर येथील बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांचे अधिकृत संघ ताकदीने सहभागी होणार आहेत.

या लीगमध्ये अहिल्यानगर शहरातून सहभागी होणाऱ्या संघात अहिल्यानगर बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांसह प्रमुख पदाधिकारी व सक्रिय रंगकर्मी खेळाडू म्हणून मैदानात उतरणार आहेत.

बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित या अनोख्या क्रीडा महोत्सवाचा बाल प्रेक्षक, नाट्यप्रेमी आणि पालकांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन माध्यमांतून आस्वाद घ्यावा आणि खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या मध्यवर्तीतर्फे करण्यात आले आहे.

# अवैध दारु विक्रेते, जुगार अड्ड्यांवर छापे, लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – जिल्ह्यातील अवैध दारू विक्री व जुगार अड्ड्यांविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) विशेष मोहीम हाती घेतली केली. या कारवाईत दोन अवैध दारू विक्रेत्यांवर तसेच तीन जुगार अड्ड्यांवर छापे टाकून एकूण १ लाख ४ हजार ८५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांची माहिती संकलित करून कठोर कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक दिपक मेढे व अनंत सालगुडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. या पथकांमध्ये पोलीस अंमलदार विष्णु भागवत, विजय पवार, गणेश धोत्रे, सुनिल पवार, शाहिद शेख, प्रकाश मांडगे, सागर ससाणे, रोहित येमुल आणि अमोल आजबे यांचा समावेश होता. पथकांनी जिल्ह्यातील विविध भागांत गुप्त माहितीच्या आधारे शोधमोहीम राबविली.

३ जून २०२६ रोजी श्रीरामपूर शहर, कोतवाली आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध दारू विक्री व जुगार अड्ड्यांवर छापे टाकण्यात आले. यामध्ये दोन ठिकाणी अवैध दारू विक्रीवर तर तीन ठिकाणी जुगार अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली. कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत एका अवैध दारु विक्रेत्यावर छापा टाकून गुन्हा नोंदविण्यात आला. तसेच या विक्रेत्याकडून देशी, विदेशी मद्यासह ५६ हजार ३६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत एका जुगार अड्यावर छापा टाकून ३ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करुन गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत एका दारु विक्रेत्यावर कारवाई करीत ७ हजार ६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच दोन जुगार अड्यांवर छापे टाकून ३६ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्व कारवायांमध्ये मिळून पाच गुन्हे दाखल करण्यात आले असून १ लाख ४ हजार ८५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधातील मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत दिले असून, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा कारवाया अधिक तीव्र केल्या जाणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

# नगरमध्ये अवैध मावा निर्मितीवर छापा; साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर – तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या मावा व सुगंधी तंबाखू तयार करणाऱ्या दोन ठिकाणांवर एमआयडीसी पोलिसांनी धडक कारवाई करत ३ लाख ३४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक माणिक बी. चौधरी यांना कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस पथकाने ३ जून रोजी दोन ठिकाणी छापे टाकून ही कारवाई केली.

पहिली कारवाई बाराईमाम, कोठला येथे करण्यात आली. येथे अवैधरित्या मावा तयार करत असल्याची खात्री झाल्यानंतर पंचांसमक्ष छापा टाकण्यात आला. या वेळी शाहीद फारुख शेख (वय २५, रा. बाराईमाम, कोठला) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून मावा तयार करण्यासाठी लागणारी सुपारी, सुगंधी तंबाखू, मावा बनविण्याची मशीन तसेच तयार मावा असा १ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसरी कारवाई गुलमोहर रोड, आम्रपाली मंगल कार्यालयासमोर करण्यात आली. या ठिकाणी अक्षय राजू पवार (वय १९, रा. निंबळक, ता. जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून मावा निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य, मशीन आणि तयार मावा असा १ लाख ६८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या दोन्ही कारवायांमध्ये मिळून ३ लाख ३४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमाल आणि आरोपींना पुढील तपासासाठी तोफखाना पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक माणिक बी. चौधरी, सहाय्यक फौजदार राकेश खेडकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजू सुद्रीक, अजिनाथ पालवे, मुकुंद दुधाळ, साईनाथ टेमकर, संदीपान पितळे, तसेच पोलीस कॉन्स्टेबल दिपक फुंदे, नवनाथ दहिफळे, सुरज देशमुख, किशोर जाधव, अक्षय रोहोकले, उमेश शेरकर आणि सचिन हरदास यांच्या पथकाने केली.

# आभा कार्ड असूनही कॅशलेस उपचारांपासून वंचित; पूर्वीप्रमाणे वैद्यकीय लाभ सुरू ठेवण्याची मागणी

### शिक्षकांच्या आरोग्य सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर : भाजप शिक्षक सेलचा शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे पाठपुरावा

नगर – राज्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, जिल्हा परिषद तसेच १०० टक्के अनुदानित खासगी शाळांमधील कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे वैद्यकीय बिल परतावा योजना कायम ठेवावी किंवा पर्यायाने संपूर्णपणे प्रभावी कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भाजप शिक्षक सेलच्या वतीने जिल्हाध्यक्ष वैभव सांगळे यांनी केली आहे. या संदर्भात शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती सांगळे यांनी दिली.



सध्या केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ‘आभा कार्ड’ काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्यास सुरुवात केली आहे. शासनाचा हा निर्णय सकारात्मक आणि स्वागतार्ह असला, तरी प्रत्यक्षात अनेक खासगी रुग्णालयांमध्ये आभा कार्डधारकांना अपेक्षित कॅशलेस उपचार सुविधा मिळत नसल्याचे वास्तव समोर येत आहे.

यामुळे गंभीर आजार, अपघात किंवा आकस्मिक वैद्यकीय उपचारांच्या वेळी शिक्षकांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक शिक्षकांना स्वतःच्या खिशातून लाखो रुपयांचा खर्च करावा लागत असून, शासनाच्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वैभव सांगळे यांनी सांगितले की, आभा कार्ड आणि विविध आरोग्य योजनांचा उद्देश चांगला असला तरी प्रत्यक्ष लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. अनेक रुग्णालयांकडून कॅशलेस सुविधा नाकारली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी ही योजना केवळ कागदोपत्री राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी समाज घडविण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करतात. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे, शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविणे आणि सामाजिक विकासात योगदान देणे यासाठी ते आयुष्यभर सेवा बजावत असतात. अशा परिस्थितीत आरोग्याच्या गंभीर संकटावेळी त्यांना शासनाचा ठोस आणि विश्वासार्ह आधार मिळणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

पूर्वी अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय बिल परतावा योजनेमुळे शिक्षक आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये सुरक्षिततेची भावना होती. आवश्यकतेनुसार कोणत्याही रुग्णालयात उपचार घेऊन त्यावरील खर्चाचा परतावा मिळत असल्याने आर्थिक ताण कमी होत होता. मात्र, नव्या योजनांमध्ये मर्यादित रक्कम, निश्चित रुग्णालयांची अट किंवा इतर तांत्रिक अडचणी असल्यास कर्मचाऱ्यांना दर्जेदार उपचार मिळविण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात. आजच्या काळात कर्करोग, हृदयविकार, मूत्रपिंड विकार, अपघात अशा गंभीर आजारांवरील उपचारांसाठी लाखो रुपयांचा खर्च येतो. अशा वेळी सर्वसामान्य आरोग्य योजनांच्या चौकटीत शिक्षकांना समाविष्ट करून त्यांच्या वैद्यकीय गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत, अशी भावना शिक्षकांमध्ये वाढत आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे शासनाचे विश्वासू घटक असून त्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे सेवा दिलेली असते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याची तसेच त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेची जबाबदारी शासनाने विशेष संवेदनशीलतेने घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. पूर्वीप्रमाणे वैद्यकीय बिल परतावा योजना कायम ठेवणे किंवा सर्व शासकीय व अनुदानित कर्मचाऱ्यांसाठी कोणतीही अडचण न येणारी प्रभावी कॅशलेस वैद्यकीय योजना लागू करणे ही काळाची गरज असल्याचे भाजप शिक्षक सेलच्या वतीने नमूद करण्यात आले आहे.

# ‘आभा कार्ड’ असूनही शिक्षक कॅशलेस उपचारांपासून वंचित; खासगी रुग्णालयांमध्ये तात्काळ सुविधा लागू करण्याची मागणी

### शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन

नगर – राज्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत आभा कार्ड काढत असले तरी प्रत्यक्षात खासगी रुग्णालयांमध्ये त्यांना कॅशलेस उपचार सुविधा मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन पाठविले असून, या संदर्भात त्यांचे लक्ष वेधण्यात आले आहे.



शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आभा कार्ड काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाचा हा निर्णय स्वागतार्ह असला तरी प्रत्यक्ष उपचाराच्या वेळी अनेक खासगी रुग्णालयांकडून शिक्षकांना कॅशलेस सुविधा नाकारली जात असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.


याबाबत शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समाज घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असताना गंभीर आजार, अपघात किंवा वैद्यकीय संकटाच्या वेळी त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक शिक्षकांना लाखो रुपयांचा वैद्यकीय खर्च करावा लागत असून शासनाच्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने ही योजना केवळ कागदोपत्री राहण्याची भीती निर्माण झाली आहे.

प्रसाद शिंदे यांनी शासनाकडे राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आयुष्यमान भारत योजनेत पूर्ण समावेश करण्याची मागणी केली आहे. तसेच सर्व खासगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचार सुविधा बंधनकारक करण्यात यावी, आभा कार्डधारक शिक्षकांना उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि जिल्हास्तरावर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

यासोबतच, जोपर्यंत सर्वसमावेशक योजना पूर्णपणे कार्यान्वित होत नाही, तोपर्यंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पूर्वीप्रमाणे वैद्यकीय बिले स्वीकारण्यात यावीत, ही प्रमुख मागणीही प्रसाद शिंदे यांनी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे. या विषयावर लवकरच नाशिक शिक्षक मतदार संघाचे आमदार किशोर दराडे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची भेट घेणार असल्याची माहिती शिंदे यांनी दिली

# अहिल्यानगर शहरातील कोहिनूर मॉल येथे ६ ते १४ जूनपर्यंत शिव चित्र चरित्राचे प्रदर्शन

नगर – सौ. रती देशमुख यांनी काढलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चित्र चरित्राचे प्रदर्शन कोहिनूर मॉल येथे भरवण्यात येत आहे. शिवराज्याभिषेकाचे औचित्य साधून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.





प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते ६ जून रोजी सकाळी होणार आहे. यावेळी सौ. अनुराधा ठाकूर या प्रमुख पाहुण्या म्हणून येत आहेत. सौ. श्वेता गांधी संचालिका कोहिनूर मॉल या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. मधुबनी शैली मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील जवळपास ४० चित्रे या प्रदर्शनात आहेत. हे ५ वे प्रदर्शन अहिल्यानगर येथे भरवण्यात येत आहे. या आधी हे प्रदर्शन पुणे, चिंचवड या ठिकाणी भरवण्यात आले होते. अभिनेत्री मृणाल कुळकर्णी, भाऊसाहेब भोईर (उपाध्यक्ष मराठी नाट्य परिषद), इतिहास अभ्यासक प्रसाद तारे यांच्या हस्ते पहिले प्रदर्शन मागील वर्षी शिवजयंतील उद्घाटित झाले होते. हे प्रदर्शन ६ ते १४ जून पर्यंत कोहिनूर मॉल येथे सर्वासाठी बघण्यासाठी उपलब्ध आहे.

सर्वांनी शिव प्रेमींनी या कलेचा आनंद घ्यावा असे आवाहन रती देशमुख यांनी केले आहे.

# भिस्तबाग चौकात नाकाबंदी; बेशिस्त वाहनचालकांना आकारला ५० हजारांचा दंड

नगर – वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध शहर वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम हाती घेतली असून, ३ जून रोजी भिस्तबाग चौकात राबविण्यात आलेल्या विशेष नाकाबंदीत बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत एकूण ३६ वाहनचालकांकडून ५० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या नेतृत्वाखाली शहर वाहतूक शाखेच्या अधिकारी, अंमलदार आणि वॉर्डन यांनी भिस्तबाग चौकात सायंकाळी ५ ते ८ या वेळेत नाकाबंदी केली होती. यावेळी वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या चालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. यात प्रामुख्याने फॅन्सी नंबर प्लेट, विना नंबर प्लेट, ट्रिपल सीट, ब्लॅक फिल्म आणि विना हेल्मेट फिरणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

फॅन्सी नंबर प्लेट असणाऱ्या ९ केसेस करण्यात आल्या असून, त्यांच्याकडून ९ हजार ५०० रुपये दंड आकारण्यात आला. विना नंबर प्लेट असणाऱ्या ११ केसेस करण्यात आल्या असून, त्यांच्याकडून ११ हजार ५०० रुपये, ट्रिपल सीट असणाऱ्या ७ केसेस करीत त्यांच्याकडून ७ हजार ५०० रुपये, वाहनांच्या काचांना ब्लॅक फिल्म असणाऱ्या ३ केसेस करीत त्यांना ४ हजार रुपये, विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या ३ केसेस करीत त्यांना ३ हजार रुपये दंड तर विना लायसन्स असणाऱ्या ३ केसेस करुन १५ हजार रुपये दंड आकारण्यात आला. अशा पद्धतीने या मोहिमेत ३६ केसेस नोंदवून एकूण ५० हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. यामध्ये ११ हजार ५०० रुपये रोख स्वरूपात वसूल करण्यात आले असून ४० हजार रुपयांचा दंड अनपेड आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना दुचाकी चालवताना हेल्मेट वापरणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार, शहर वाहतूक शाखा दररोज सकाळी ९ ते ११ या वेळेत पोलीस अधीक्षक कार्यालय, पोलीस मुख्यालय आणि मोटार परिवहन विभाग परिसरात विशेष नाकाबंदी करत आहे. आतापर्यंत विनाहेल्मेट प्रवास करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांवर ३० केसेस करून ३० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे, अशी माहिती बोरसे यांनी दिली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. यामध्ये पीएसआय मन्सूर सय्यद, पीएसआय शामवेल गायकवाड, पीएसआय अन्सार शेख, एएसआय कोडम यांच्यासह पोलीस अंमलदार सतीश दळवी, आबासाहेब चव्हाण, ज्ञानेश्वर खराडे आणि वॉर्डन दिशान शेख, महेश घोरपडे, संजय रणदिवे, सुदर्शन कारखिले, भरत शिरसाठ यांनी सहभाग घेतला.

